RNI No.: MAHBIL/2016/68485

www.acrossstates.com

मराठी
# अक्रॉस मुंबई

संपादक - संजय मंगेश भैरे

वर्ष: ११ अंक :९ ■ मुंबई, मंगळवार २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२६

मूल्य - ५.०० रुपये ■ पाने - ८

### महामार्गावर काम सुरू असल्यास टोलमध्ये ७० टक्के सवलत

पान २ वर

### जे.जे. रुग्णालयातील 'असंवेदनशील' कारभारावर चाबूक दोषी कर्मचाऱ्यांच्या चौकशीसाठी समिती तैनात

पान ३ वर



प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा या निवासस्थानी ध्वजारोहण केले. त्याप्रसंगीचे छायाचित्र.

## कर्तव्य पथावर दिसली भारताच्या शक्तीची झलक
# 'वंदे मातरम्' चा जयघोष









**नवी दिल्ली**

भारत आज सोमवार, २६ जानेवारी २०२६ रोजी आपला ७७वा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहे. या निमित्ताने संपूर्ण देशात कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. राजधानी दिल्लीमध्ये चारही बाजूंनी किल्लेबंदी करण्यात आली आहे. या सोहळ्याच्या माध्यमातून जगाला भारताच्या लोकशाही आणि सांस्कृतिक वारशाची झलक पाहायला मिळत आहे.

कर्तव्य पथावर निघालेल्या परेडमध्ये देशाची विविधता, लष्करी सामर्थ्य आणि लोकशाही मूल्यांचे भव्य दर्शन घडले. ७७व्या प्रजासत्ताक दिनाचे यंदाचे प्रमुख अतिथी म्हणून दोन मान्यवर भारतात उपस्थित होते—युरोपीय परिषदचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपीय आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला व्हॉन डेर लेन.

'ऑपरेशन सिंदूर'मध्ये वापरण्यात आलेल्या प्रमुख शस्त्रास्त्रांचे नमुनेही यावेळी प्रदर्शित करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सकाळी १० वाजून ३७ मिनिटांनी परेडची सलामी स्वीकारली. ७७व्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय युद्धस्मारकावर शहीदांना श्रद्धांजली अर्पण करून केली. त्यानंतर राष्ट्रपती मुर्मू प्रमुख अतिथींसह कर्तव्य पथावर पोहोचल्या. या प्रसंगी सुमारे ३० झांक्यांचे सादरीकरण करण्यात आले, तर संपूर्ण कार्यक्रम ९७ मिनिटे चालला.

पंजाबची झांकी नववे शीख गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या शहादतीच्या ३५०व्या वर्षानिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करते. 'हिंद दी चादर' म्हणून ओळखले जाणारे गुरु तेग बहादूर साहिब जी मानवाची अंतरात्मा, श्रद्धा आणि स्वातंत्र्याचे रक्षक म्हणून पूजनीय आहेत.

**संस्कृती मंत्रालयाची झांकी : 'वंदे मातरम्'च्या १५०व्या वर्षाची आठवण**

संस्कृती मंत्रालयाची झांकी राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'च्या १५०व्या वर्धापनदिनाची आठवण करून देते. १८७५ साली बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी रचलेले 'वंदे मातरम्' हे केवळ राजकीय प्रचारासाठी नव्हे, तर एक सांस्कृतिक आणि सभ्यतागत आवाहन म्हणून पुढे आले. तुरुंगांमध्ये, सार्वजनिक सभांमध्ये आणि स्वातंत्र्य चळवळीतील मोर्चांमध्ये गायले जाणारे हे गीत संपूर्ण भारतातील जनतेला एकत्र बांधणारे ठरले.





### महाराष्ट्राचा चित्ररथ कर्तव्यपथावर येताच चैतन्य संचारले

महाराष्ट्राच्या या चित्ररथाची रचना अत्यंत कलात्मक आणि डोळ्यांचे पारणे फेडणारी ठरली. चित्ररथाच्या अग्रभागी महाराष्ट्राच्या ऊर्जेचे प्रतीक असलेला एक भव्य ढोल आणि तो वाजवणारी पारंपारिक वेशभूषेतील महिला राज्याच्या प्रबळ स्त्रीशक्तीचे दर्शन घडविले. चित्ररथाच्या मध्यभागात गणपतीची देखणी मूर्ती साकारणारा मूर्तिकार आणि विसर्जनासाठी निघालेला गणेशभक्त दर्शवण्यात आला. चित्ररथाच्या शेवटच्या भागात महाराष्ट्राचे श्रद्धास्थान असलेल्या अष्टविनायक मंदिराची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली असून, इतर सांस्कृतिक बाबींचेही बारकाव्यांसह दर्शन घडवण्यात आले. चित्ररथाच्या दोन्ही बाजूस पारंपारिक नऊवारी साडी परिधान केलेल्या महिलांचे लेझीम पथकाने लोकांची मने जिंकली. महाराष्ट्राचा चित्ररथ येताच केंद्रीय कॅबिनेट मंत्री पियुष गोयल आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी सन्मानाने उभे राहिले.





## भाजपने परवानगी दिली तर नामोनिशाण मिटवून टाकेन
### गणेश नाईकांनी शिंदेंना पुन्हा ललकारले



**मुंबई, प्रतिनिधी**

राज्यातील 29 महापालिकांच्या निवडणुका 15 जानेवारी रोजी पार पडल्या. या निवडणुकांपूर्वीच नवी मुंबईत गणेश नाईक विरुद्ध एकनाथ शिंदे असा राजकीय 'सामना' रंगला होता. निवडणूक निकालानंतर हा वाद संपेल, असे वाटत असतानाच आता हा वाद पुन्हा एकदा पेटण्याची शक्यता आहे. भाजप नेते आणि वनमंत्री गणेश नाईक यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लक्ष्य करत आक्रमक विधान केले आहे.

"भाजपाने परवानगी दिली, तर यांचे नामोनिशाण संपवून टाकू. मी आज परत बोलतो आहे," असा थेट इशारा देत गणेश नाईक यांनी एकनाथ शिंदेंना डिवचले. मात्र, भाजप हा शिस्त पाळणारा पक्ष असल्याचे अधोरेखित करत, "पक्षाने आदेश दिला म्हणून आम्ही ते मान्य केले. मनाला पटले नसले तरीही कार्यकर्त्यांनी सहन केले. पक्ष नेतृत्वाचा निर्णय आम्ही मान्य केला," असेही त्यांनी स्पष्ट केले.

नाईक म्हणाले, "एके काळी मी माझी भूमिका स्पष्टपणे मांडली होती. ठाणे जिल्ह्यासह संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशात (MMR) महायुतीतील सर्व कार्यकर्त्यांना स्वतंत्रपणे लढू द्यावे. निवडणुकीनंतर ज्यांचे नगरसेवक जास्त निवडून येतील, त्यांना मित्र पक्षांनी पाठिंबा द्यावा आणि उर्वरित पदांची वाटणी करावी, असे माझे मत होते," असे देखील त्यांनी सांगितले.

या संदर्भात आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केल्याचेही गणेश नाईक यांनी सांगितले. "मी ही बाब मुख्यमंत्र्यांना सांगितली होती. त्यांनी त्यावर होकार दिला नाही आणि नकारही दिला नाही. आम्हाला अपेक्षा होती की कार्यकर्त्यांना संधी मिळेल, मात्र काही ठिकाणी ती संधी मिळाली नाही," असे नाईक म्हणाले.

नवी मुंबईतील जागावाटपावर भाष्य करताना नाईक म्हणाले, "नवी मुंबईत शिवसेनेकडून 57 जागांची मागणी करण्यात आली होती. मात्र, आम्ही त्यांना 20 ते 22 जागा देण्यास तयार होतो. शेवटच्या दिवसापर्यंत चर्चा सुरू होत्या. अखेर त्यांनी एबी फॉर्म भरले आणि आम्हीही भरले. त्यानंतर जे झालं, ते चांगलंच झालं," असा टोला त्यांनी लगावला. ते पुढे म्हणाले, "ठाण्यातील लोकांना अशी करामत करता आली नाही. ठाण्यात भाजपाच्या घोड्यांचे लगाम खेचले गेले. कल्याणमध्येही तसेच झाले. तरीही पक्षाला जे मान्य होते, ते आम्ही मान्य केले, " असे देखील गणेश नाईक यांनी म्हटले आहे.

## 'हिंद-दी-चादर' गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानातून
# मानवी मूल्यांच्या रक्षणाची प्रेरणा - मुख्यमंत्री

- श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानाचा इतिहास घराघरात पोहचवण्याचा सरकारचा प्रयत्न
- श्री गुरु नानक देवजी यांच्या विचारांवर श्रद्धा ठेवणारे नऊ समाज प्रथमच लाखोंच्या संख्येने एकत्र

**प्रतिनिधी**
■ **नांदेड**

'हिंद-दी-चादर' गुरू तेग बहादुर साहिबजी यांचे बलिदान मानवी मूल्यांसाठी होते. त्यांचे बलिदान आपल्याला सत्य, धर्म आणि मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी निर्भीडपणे उभे राहण्याची प्रेरणा देते. त्यामुळेच त्यांचे विचार राज्यातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नांदेड येथील मोदी मैदानावर आयोजित 'हिंद दी चादर' श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या 350 व्या शहीदी समागम कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी



उपमुख्यमंत्री अजित पवार, आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री कोनिडला पवन कल्याण, राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, दिल्लीचे मंत्री सरदार मनजिंदर सिंघ सिरसा, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गुरू तेग बहादुर साहिब जी यांनी दिलेले बलिदान हे केवळ शीख धर्मासाठी नव्हते, तर या देशाची संस्कृती, सभ्यता, विचारधारा आणि धर्म यांच्या रक्षणासाठी होते. त्यांचा पराक्रम, वीरता, शौर्य आणि सर्वोच्च बलिदानाला अभिवादन करण्यासाठी लाखोंच्या संख्येने समाज नांदेडच्या ऐतिहासिक भूमीत एकत्र आला आहे. गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या बलिदानामुळे संपूर्ण देशात धर्म, स्वातंत्र्य आणि आत्मसन्मानासाठी लढण्याची नवी चेतना निर्माण झाली. त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांपर्यंत पोहचावा, यासाठी शहीदी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून प्रत्येक गावात, वाड्या-वस्त्यांवर जावून श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा इतिहास घराघरात पोहचवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शीख गुरूंचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम राज्य शासनाने हाती घेतले आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## जगात अस्थिरता असूनही भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढतेय!

**वृत्तसंस्था**
■ **नवी दिल्ली**



प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशाला संबोधित केलं आहे. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या भाषणात भारत ही सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था आहे, शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. राष्ट्रवादाची भावना देशाच्या एकतेचा एक मजबूत पाया आहे. भारत आत्मनिर्भर होत आहे. जागतिक स्तरावर अनिश्चितता असूनही भारताचा वेगाने विकास होत आहे, अशा विविध मुद्द्यांवर द्रौपदी मुर्मू यांनी भाष्य केलं आहे.

शेतकरी देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं. शेतकऱ्यांनी आपल्या देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवलं. आपण देशात आणि परदेशात पूर्ण उत्साहात प्रजासत्ताक दिन साजरा करणार आहोत. प्रजासत्ताक दिन आपल्याला आपल्या देशाच्या भूतकाळातील, वर्तमानातील आणि भविष्यातील स्थिती आणि दिशा यावर चिंतन करण्याची संधी देतो, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे.

भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था आहे. जागतिक स्तरावर अनिश्चितता आहे. मात्र, अशा परिस्थितीत देखील भारत सर्वात वेगानं वाढणारी मोठी अर्थव्यवस्था आहे. जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याचं आपलं ध्येय साध्य करण्याच्या दिशेने आपण वाटचाल करत आहोत, असंही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे.

## 131 मान्यवरांना पद्म पुरस्कार जाहीर
### महाराष्ट्रातील 15 गुणीजणांचा सन्मान

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारने देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक असलेल्या 'पद्म पुरस्कार 2026' ची घोषणा करण्यात आली. यावर्षी एकूण 131 मान्यवरांना पद्म पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये कला क्षेत्रातील दिग्गजांचा दबदबा पाहायला मिळत आहे. बॉलिवूडचे दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांना कला क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानासाठी मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

**पद्मभूषण देऊन 13 मान्यवरांचा होणार सन्मान**

यंदाच्या वर्षी 13 मान्यवरांना पद्मभूषण जाहीर करण्यात आला आहे. गायन





क्षेत्रातील प्रसिद्ध पार्श्वगायिका अलका याग्निक तसेच, मल्याळम चित्रपटसृष्टीचे सुपरस्टार मामुटी यांना कला क्षेत्रातील योगदानासाठी हा सन्मान मिळाला आहे. तसेच, जाहिरात क्षेत्रातील दिग्गज दिवंगत पियुष पांडे, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनाही सन्मानित करण्यात येणार आहे. तर, झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांना मरणोत्तर पद्मभूषण जाहीर झाला आहे.

**क्रीडा क्षेत्रात 9 मान्यवरांचा पद्मश्री पुरस्काराने सन्मान**

यंदाच्या वर्षी क्रीडा क्षेत्रातील 9 जणांना पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. क्रिकेटमधील योगदानासाठी टीम इंडियाचा माजी कर्णधार रोहित शर्मा तसेच भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर या दोघांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. भारताचा माजी वेगवान गोलंदाज प्रवीण कुमार याचाही या यादीत समावेश आहे. तसेच, भारतीय महिला हॉकी संघाची गोलकीपर सविता पुनिया यांचे नावही यामध्ये आहे. त्याशिवाय, माजी टेनिसपटू विजय अम्रितराज, बलदेव सिंग, बुंदेली मार्शल आर्ट्सचे पुनरुज्जीवन – जतन करणारे भगवानदास राईकवार, पुडुचेरी येथील प्रसिद्ध सिलंबट्टम तज्ञ के पजानिवेल यांना पद्मश्रीने गौरविण्यात येणार आहे. तसेच, भारताला ऑलिम्पिक पदक जिंकून देणाऱ्या खेळाडूंचे प्रशिक्षक व्लादिमीर मेस्तविरिशविली यांना मरणोत्तर पद्मश्री जाहीर झाला आहे.

**भारताचा 'किवीं'वर दणदणीत मालिका विजय**

***गुवाहाटी*** - *भारतीय संघाने न्यूझीलंडचा तिसऱ्या टी-२० सामन्यात विक्रमी विजय मिळवला. या विजयासह भारताने टी-२० मालिका आपल्या नावे केली आहे. भारताने अवघ्या १० षटकांत न्यूझीलंडविरूद्ध तिसरा टी-२० सामना जिंकला. सूर्यकुमार यादव व अभिषेक शर्मा यांनी वादळी अर्धशतकं झळकावत संघाला सहज विजय मिळवून दिली. अभिषेक शर्मा व ईशानने पॉवरप्लेमध्ये आक्रमक फटकेबाजी करत संघाच्या विजयाचा पाया रचला आणि सूर्या व अभिषेक संघाला विजय मिळवून देत नाबाद माघारी परतले. या शानदार विजयासह टीम इंडियाने वन डे मालिकेतील आपल्या पराभवाचे उट्टे फेडले आहे.*

# एसटी प्रवाशांच्या जीवाशी खेळणाऱ्यांची खैर नाही!

## मंत्री प्रताप सरनाईक यांचा परळ डेपोत 'राडा'

**मुंबई, प्रतिनिधी**

तुम्ही एसटीने प्रवास करताय? तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. एसटीचे चालक आणि वाहक चक्क दारू पिऊन गाड्या चालवत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आज खुद्द परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी परळ बस स्थानकावर अचानक छापा टाकला आणि तिथे जे दिसलं, ते पाहून मंत्र्यांचा पारा सातव्या अस्मानावर चढला!



मंत्री सरनाईक यांनी कोणताही पूर्वसूचना न देता परळ डेपो गाठला. चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहात (Rest Room) जाताच मंत्र्यांना तिथे दारूच्या रिकाम्या बाटल्यांचा खच दिसला. इतकंच नाही, तर काही कर्मचाऱ्यांच्या तोंडाला मद्याचा उग्र वास येत होता. या गंभीर प्रकारामुळे मंत्र्यांनी तिथेच उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांची सर्वांसमोर 'झाडाझडती' घेतली.

विश्रांतीगृहाची अवस्था पाहून संतप्त झालेले सरनाईक कडाडले, "प्रवासी तुमच्यावर विश्वास ठेवून प्रवास करतात आणि तुम्ही त्यांच्या जीवाशी खेळताय? हे खपवून घेतलं जाणार नाही!" त्यांनी ऑन द स्पॉट खालील मोठे निर्णय घेतले आहेत:

ब्रेथ ॲनालायझर अनिवार्य: आता प्रत्येक चालकाला ड्युटीवर जाण्यापूर्वी 'फुंक' मारावीच लागणार. चाचणी पॉझिटिव्ह आली की नोकरी धोक्यात!

बडतर्फीची टांगती तलवार: चौकशीत दोषी आढळल्यास कर्मचाऱ्याला थेट सेवेतून काढून टाकले जाईल.

मंत्री केवळ कर्मचाऱ्यांवर थांबले नाहीत, तर त्यांनी सुरक्षा आणि दक्षता विभागाच्या (Vigilance) अधिकाऱ्यांनाही धारेवर धरले. "तुमचं लक्ष कुठे आहे? अधिकारी झोपले आहेत का?" असा सवाल करत त्यांनी दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांच्याही विभागीय चौकशीचे आदेश दिले आहेत.

दारूच्या प्रकरणासोबतच सरनाईक यांनी आगारातील प्रसाधनगृहे, बसेसची दुरवस्था आणि स्वच्छतेची पाहणी केली. प्रवाशांना मिळणाऱ्या वागणुकीत सुधारणा झाली नाही, तर अधिकाऱ्यांनी कारवाईला तयार राहावे, असा 'अल्टिमेटम'च त्यांनी दिला आहे.

# महामार्गावर काम सुरू असल्यास टोलमध्ये ७० टक्के सवलत; केंद्र सरकारचा वाहनधारकांना मोठा दिलासा

**मुंबई, प्रतिनिधी**




राष्ट्रीय महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांसाठी केंद्र सरकारने एक अत्यंत महत्त्वाचा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. महामार्गाच्या रुंदीकरणाचे किंवा दुरुस्तीचे काम सुरू असताना प्रवाशांना होणारा मनस्ताप लक्षात घेऊन, आता अशा मार्गांवर टोल दरात ७० टक्क्यांपर्यंत कपात करण्यात आली आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने 'राष्ट्रीय महामार्ग शुल्क नियम २००८' मध्ये सुधारणा करून ही नवी नियमावली जाहीर केली आहे.

**विस्तारीकरण सुरू असल्यास 'खिशाला' कात्री नाही**

अनेकदा दोन पदरी (Two-lane) महामार्गाचे चार पदरीकरण करण्याचे काम सुरू असताना प्रवाशांना वाहतूक कोंडी आणि खराब रस्त्यांचा सामना करावा लागतो. अशा स्थितीतही वाहनधारकांकडून पूर्ण टोल वसूल केला जात होता. मात्र, नव्या नियमानुसार, ज्या महामार्गाचे विस्तारीकरण सुरू असेल, तिथे बांधकाम पूर्ण होईपर्यंत वाहनधारकांना केवळ ३० टक्के टोल भरावा लागेल. उर्वरित ७० टक्के रक्कम माफ असेल.

**सवलतीचे नवे निकष:**

सरकारने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, सवलतीचे स्वरूप खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे:

७०% सूट: जर दोन पदरी महामार्गाचे चार किंवा त्यापेक्षा अधिक पदरी करण्याचे काम सुरू असेल, तर केवळ ३०% टोल आकारला जाईल.

२५% सूट: जर चार पदरी महामार्गाचे सहा किंवा आठ पदरी करण्याचे काम सुरू असेल, तर प्रवाशांना ७५% टोल भरावा लागेल.

खर्च वसुलीचे नियम: ज्या महामार्गांचा बांधकामाचा खर्च वसूल झाला आहे, तिथे केवळ ४० टक्के देखभाल शुल्क घेण्याचा नियम यापुढेही कायम राहणार आहे.

**प्रकल्पाच्या कालावधीतच लाभ**

नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडियाच्या (NHAI) नव्या नियमानुसार, ज्या दिवशी प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल, त्या दिवसापासून ते प्रकल्प पूर्ण होऊन रस्ता वाहतुकीस पूर्णपणे सज्ज होईपर्यंत ही टोल सवलत लागू राहील. विशेष म्हणजे, हा नियम सध्या सुरू असलेल्या प्रकल्पांना आणि भविष्यातील नवीन महामार्गांनाही लागू होणार आहे.

**वाहनधारकांच्या तक्रारींची दखल**

महामार्गावर काम सुरू असताना तासनतास लागणाऱ्या रांगा आणि धुळीचा त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी देशभरातून येत होत्या. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी या तक्रारींची दखल घेत, 'जोपर्यंत रस्ता पूर्णपणे उपलब्ध होत नाही, तोपर्यंत पूर्ण टोल का?' असा विचार मांडला होता. त्या पार्श्वभूमीवर घेतलेला हा निर्णय सामान्य प्रवाशांसाठी मोठी आर्थिक बचत करणारा ठरणार आहे.

या निर्णयामुळे आता टोल प्लाझावरील वादाचे प्रसंग कमी होण्याची आणि प्रवाशांचा प्रवास सुखकर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# भुजबळांना दिलासा मिळताच अंजली दमानिया आक्रमक कोर्टाच्या निर्णयाला हायकोर्टात देणार आव्हान

**मुंबई, प्रतिनिधी**



महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांना मोठा दिलासा मिळाला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) नंतर आता सक्तवसुली संचालनालयाने (ED) दाखल केलेल्या गुन्ह्यातूनही त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. मात्र, भुजबळांचा हा आनंद अल्पकाळ टिकण्याची चिन्हे आहेत, कारण सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आता या निर्णयाविरोधात दंड थोपटले आहेत.

**नेमके प्रकरण काय?**

दिल्लीतील महाराष्ट्र सदन बांधकामात गैरव्यवहार झाल्याचा आरोप भुजबळांवर होता. या प्रकरणी तपास यंत्रणांनी त्यांना दोषमुक्त केले आहे. मात्र, अंजली दमानिया यांनी या निर्णयाला विरोध केला आहे. "भुजबळ पूर्णपणे निर्दोष सुटलेले नाहीत, अजूनही काही प्रकरणे प्रलंबित आहेत," असे सांगत दमानिया यांनी या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाद मागण्याचे जाहीर केले आहे.

**दमानियांचे आरोप काय?**

पत्रकार परिषदेत बोलताना अंजली दमानिया यांनी सरकार आणि तपास यंत्रणांवर गंभीर आरोप केले:

तपास यंत्रणांचे दुर्लक्ष: एसीबी आणि ईडीने भुजबळांच्या दोषमुक्तीला विरोध करायला हवा होता, पण त्यांनी तसे केले नाही.

राजकीय लागेबांधे: आधीच्या सरकारप्रमाणेच सध्याचे सरकारही भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप त्यांनी केला.

अजून लढा बाकी: भुजबळांविरुद्ध आपण ११ प्रकरणांत तक्रार केली होती, त्यापैकी फक्त दोनच प्रकरणांत त्यांना दिलासा मिळाला आहे, असे दमानिया यांनी स्पष्ट केले.

**पुढचे पाऊल काय?**

अंजली दमानिया आता या निर्णयावर स्थगिती आणण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार आहेत. तसेच, त्यांनी या संदर्भात देशाचे सरन्यायाधीश आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिणार असल्याचेही सांगितले आहे.

यामुळे, ईडीच्या कचाट्यातून सुटलेल्या छगन भुजबळ यांच्या अडचणी पुन्हा वाढणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# बदलापूरच्या घटनेनंतर सरकारला जाग! लहान मुलांच्या सुरक्षेसाठी येणार नवा 'कडक' कायदा; मसुदा अंतिम टप्प्यात

**मुंबई, प्रतिनिधी**

बदलापूर येथील शाळेत लहान मुलींवर झालेल्या अत्याचारानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. या पार्श्वभूमीवर, लहान बालकांच्या सुरक्षेसाठी राज्य सरकार आता एक स्वतंत्र आणि कठोर कायदा करण्याच्या तयारीत आहे. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शासनाला सादर केलेल्या निवेदनाची दखल घेत उपमुख्यमंत्री कार्यालयाने हा कायदा अंतिम टप्प्यात असल्याची महत्त्वाची माहिती दिली आहे.

शिक्षण विभागाने तयार केलेला हा नवीन कायदा विशेषतः ० ते ६ वयोगटातील बालकांच्या सुरक्षेवर केंद्रित असेल. यामध्ये खालील महत्त्वाच्या तरतुदी असणार आहेत:

ECCE केंद्रांवर नियंत्रण: प्रारंभिक बालसंगोपन व शिक्षण केंद्रे (ECCE), पूर्वप्राथमिक शाळा आणि अंगणवाड्या यांसाठी कडक नियमावली.

आस्थापनांची व्याख्या: बालकांशी संबंधित सर्व संस्थांची स्पष्ट व्याख्या करून त्यांची प्रशासकीय जबाबदारी निश्चित केली जाणार.

नियंत्रण यंत्रणा: बालकांच्या सुरक्षेत त्रुटी आढळल्यास संबंधित संस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि कारवाई करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारली जाणार.

**विधी व न्याय विभागाच्या मान्यतेची प्रतीक्षा**

उपमुख्यमंत्री कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, शिक्षण विभागाने या कायद्याचा मसुदा (Draft) अंतिम केला आहे. आता महिला व बालविकास विभाग तसेच विधी व न्याय विभागाची मोहर उमटल्यानंतर हा मसुदा मंजुरीसाठी विधानमंडळात सादर केला जाईल.

लहान मुलांच्या सुरक्षेबाबत सत्वर दखल घेतल्याबद्दल डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सरकारचे आभार मानले आहेत. मात्र, त्यांनी एक महत्त्वाची सूचनाही केली आहे. "नवा कायदा अस्तित्वात येईपर्यंत बराच वेळ जाऊ शकतो, तोपर्यंत शाळा आणि संगोपन केंद्रांमध्ये तात्पुरत्या पण अत्यंत कठोर प्रशासकीय उपाययोजना राबविणे गरजेचे आहे," असे त्यांनी अधोरेखित केले.

"लहान मुलांच्या सुरक्षिततेसाठी हा कायदा मैलाचा दगड ठरेल. बदलापूरसारख्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सरकारचे हे पाऊल स्वागतार्ह आहे." डॉ. नीलम गोऱ्हे, उपसभापती, विधान परिषद

बदलापूर घटनेच्या जखमा अजूनही ओल्या असताना, या कायद्यामुळे पालकांमध्ये काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. आता हा कायदा कधी लागू होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमेत १० हजार दंड वसूली व ११.५ किलो प्लास्टिक पिशव्या जप्त

**मुंबई, प्रतिनिधी**



प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमांमध्ये सातत्य राखण्यात येत असून दि. 22 जानेवारी रोजी 5 व्यावसायिकांकडून रू. 25 हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि 7 कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांच्या साठा जप्त करण्याप्रमाणेच सलग दुस-या दिवशीही 23 जानेवारी रोजी राबविण्यात आलेल्या मोहीमेत 2 व्यावसायिकांकडे प्लास्टिक पिशव्यांचा वापर आढळल्याने रू. 10 हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि 11.5 कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्तीची धडक कारवाई करण्यात आलेली आहे.

यामध्ये वाशी विभागात 5 हजार दंडवसूली व 1 कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्यांची जप्ती तसेच तुर्भे विभागात 5 हजार दंडवसूली आणि 3.5 कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्या जप्त करण्यात आलेल्या आहेत. प्लास्टिकमुक्त नवी मुंबई करिता विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. तसेच प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमा राबविण्यात येत आहेत. याविषयी केंद्रीय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त निर्देशानुसार एकल वापर प्लास्टिक बंदीच्या अनुषंगाने विशेष मोहीमा राबविण्यात येत आहेत.

प्लास्टिकचा धोका लक्षात घेऊन नागरिकांनी प्लास्टिक पिशव्यांचा व एकल वापर प्लास्टिकच्या वस्तूंचा वापर पूर्णपणे थांबवावा आणि कापडी पिशव्यांचा पर्याय स्विकारावा असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# चंद्रपूरचा 'रिमोट कंट्रोल' मातोश्रीवर! 'अडीच वर्ष महापौर द्या, नाहीतर...'; ठाकरे गटाच्या अटीने काँग्रेस-भाजपची झोप उडाली

**मुंबई, प्रतिनिधी**

चंद्रपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने निर्माण झालेला सत्तेचा पेच आता थेट मुंबईतील 'मातोश्री' निवासस्थानी पोहोचला आहे. सत्तेच्या चाव्या हाती असलेल्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने "अडीच वर्ष महापौरपद आमचेच हवे" ही आक्रमक अट घातल्याने काँग्रेस आणि भाजप या दोन्ही मोठ्या पक्षांच्या गोटात कमालीची अस्वस्थता निर्माण झाली आहे. आज मुंबईत होणाऱ्या महत्त्वाच्या बैठकीनंतर चंद्रपूरचा 'नवा कारभारी' कोण, याचा फैसला होण्याची शक्यता आहे.

चंद्रपूरच्या ६६ जागांच्या रणसंग्रामात २७ जागा जिंकून काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मात्र, बहुमताचा ३४ हा जादूई आकडा गाठण्यासाठी त्यांना अद्याप ७ नगरसेवकांची गरज आहे. दुसरीकडे, २३ जागांवर विजय मिळवलेला भाजप कोणत्याही परिस्थितीत सत्ता हस्तगत करण्यासाठी पडद्यामागून हालचाली करत आहे. या 'काँटे की टक्कर'मध्ये ६ जागा जिंकलेला ठाकरे गट आणि २ जागा असलेली वंचित बहुजन आघाडी आता 'किंगमेकर'च्या भूमिकेत आली आहे.

निवडणुकीपूर्वीच ठाकरे गट आणि 'वंचित' यांची युती झाली होती. आता त्यांच्याकडे ८ हक्काचे आणि २ अपक्ष असे एकूण १० नगरसेवकांचे संख्याबळ असल्याने त्यांच्याशिवाय महापालिकेत कोणालाही पाऊल ठेवता येणार नाही. "काँग्रेसची अवस्था अशी झाली आहे की, ताट समोर आहे पण खाता येत नाही," अशी बोचरी टीका करत ठाकरे गटाच्या नेत्यांनी आपली ताकद दाखवून दिली आहे.

महापौरपद: पाच वर्षांच्या कार्यकाळात अडीच वर्षे महापौरपद ठाकरे गटाला मिळावे.

पर्यायी प्रस्ताव: महापौरपद न मिळाल्यास अडीच वर्षे उपमहापौरपद आणि स्थायी समितीचे अध्यक्षपद यावर तडजोड होऊ शकते.

ठाकरे गटाने केवळ काँग्रेससोबतच नव्हे, तर भाजपसोबत जाण्याचे दरवाजेही उघडे ठेवले आहेत. "राजकारणात काहीही घडू शकतं," या विधानाने काँग्रेसच्या गोटात धाकधूक वाढली आहे. भाजपला सत्ता मिळवण्यासाठी ११ नगरसेवकांची गरज आहे, मात्र जर भाजपने ठाकरे गटाची महापौरपदाची अट मान्य केली, तर चंद्रपूरच्या सत्तेचे समीकरण रातोरात बदलू शकते.

**आज काय ठरणार?**

चंद्रपूरचे ठाकरे गटाचे सर्व नगरसेवक आणि जिल्हा प्रमुख आज मुंबईत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेणार आहेत. या बैठकीत 'हात' मिळवणी करायची की 'कमळा'ला साथ द्यायची, याचा अंतिम निर्णय होणार आहे. त्यामुळे संपूर्ण राज्याचे लक्ष आज 'मातोश्री'वरून निघणाऱ्या आदेशाकडे लागले आहे.

# महाराष्ट्राचा 'ट्रॅफिक जाम'! सुट्ट्यांचा आनंद बनला 'शिक्षा'

**मुंबई, प्रतिनिधी**



निसर्गाच्या सानिध्यात सुट्टी घालवण्याचे स्वप्न घेऊन घराबाहेर पडलेल्या हजारो पर्यटकांवर आज रस्त्यावरच 'रात्र' काढण्याची वेळ आली आहे. सलग तीन दिवसांच्या सुट्ट्यांमुळे मुंबई आणि पुण्याबाहेर पडणाऱ्या सर्व महामार्गांचे रूपांतर जणू पार्किंग लॉटमध्ये झाले आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेस्वे असो वा मुंबई-गोवा महामार्ग, सध्या सर्वत्र फक्त लाल दिव्यांच्या रांगा आणि प्रवाशांचा संताप पाहायला मिळत आहे.

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर शनिवारी पहाटेपासूनच वाहनांचा ओघ प्रचंड वाढला. खंडाळा आणि लोणावळा घाटात तर परिस्थिती हाताबाहेर गेली आहे. महामार्ग पोलिसांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी '१५ मिनिटे ब्लॉक'चा फॉर्म्युला वापरला खरा, पण त्याचा उलटा परिणाम झाला. या १५ मिनिटांच्या थांब्यामुळे पुण्याच्या दिशेला जाणाऱ्या वाहनांची रांग तब्बल १० किलोमीटरपर्यंत मागे गेली आहे. भर उन्हात आणि तासनतास एकाच जागी थांबून राहिल्यामुळे पर्यटकांनी प्रशासनाविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला आहे.

**"सामान्य जनतेचे हाल समजले"; अडीच तास अडकल्यानंतर नेत्याची कबुली**

या वाहतूक कोंडीतून साक्षात सत्ताधारी पक्षाचे नेतेही सुटू शकले नाहीत. भाजप नेते प्रवीण दरेकर हे मुंबई-गोवा महामार्गावरून प्रवास करत असताना इंदापूर जवळ तब्बल अडीच तास ट्रॅफिकमध्ये अडकून पडले.

या अनुभवानंतर त्यांनी थेट सरकारला घरचा आहेर दिला. दरेकर म्हणाले, "मी स्वतः अडीच तास एकाच जागेवर अडकलो होतो. आज मला जाणीव झाली की अशा कोंडीत अडकल्यावर सामान्य जनतेच्या वेदना काय असतात. मी तातडीने मुख्यमंत्री महोदयांना मेसेज पाठवून या भीषण वास्तवाची कल्पना दिली असून यात तातडीने लक्ष घालण्याची विनंती केली आहे."

पुणे-सोलापूर महामार्गावरील इंदापूरच्या सरडेवाडी टोल नाक्यावर तर पाचशे मीटरपेक्षा लांब रांगा लागल्या आहेत. २५ जानेवारीची सुट्टी आणि २६ जानेवारीचा प्रजासत्ताक दिन अशा सलग सुट्ट्या जोडून आल्याने चाकरमानी गावाकडे निघाले आहेत, मात्र नियोजनाच्या अभावामुळे प्रवासाचा वेळ दुप्पट झाला आहे.

**प्रवाशांसाठी परिस्थिती काय?**

दोन तासांचा प्रवास पाच तासांवर: जो प्रवास दोन तासात व्हायला हवा होता, तिथे आता पाच ते सहा तास लागत आहेत.

घाटात अडकली कुटुंबे: लहान मुले आणि वयोवृद्ध प्रवाशांचे पिण्याच्या पाण्यासाठी आणि अन्नासाठी हाल होत आहेत.

पोलिसांची कसरत: महामार्ग पोलीस कर्मचारी ही कोंडी फोडण्यासाठी जीवाचे रान करत असले, तरी वाहनांच्या अफाट संख्येपुढे यंत्रणा तोकडी पडताना दिसत आहे.

तुम्ही जर प्रवासाचे नियोजन करत असाल, तर रात्री उशिरा किंवा पर्यायी मार्गांचा विचार करणे हिताचे ठरेल.

# सांस्कृतिक मंत्र्यांच्या हस्ते देवेंद्र भुजबळ सन्मानित




**मुंबई, प्रतिनिधी**

मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती संवर्धनासाठी न्यूज स्टोरी टुडे पोर्टल देत असलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री श्री आशिष शेलार यांच्याहस्ते या पोर्टलचे संपादक श्री देवेंद्र भुजबळ यांचा विश्वभरारी फौंडेशन आणि नॅशनल लायब्ररी, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित साहित्य संमेलनात उत्कृष्ट स्मृतिचिन्ह , सन्मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. स्वागताध्यक्ष आमदार श्री पराग आळवणी, अध्यक्ष लेखक- कवी श्री किरण येले, संमेलनाच्या आयोजिका सौ लता गुठे आणि इतर मान्यवर, साहित्य रसिक या संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी श्री देवेंद्र भुजबळ यांनी,त्यांनी लिहिलेली "आम्ही अधिकारी झालो", "करिअरच्या नव्या दिशा", "माध्यमभूषण" आणि "कला साहित्य भूषण" ही पुस्तके श्री शेलार यांना भेट दिली. या संमेलनात विचार प्रवर्तक परिसंवाद, कवी संमेलन,गझल सादरीकरण, मनोरंजन पर बहारदार कार्यक्रम झाले.

# पीजीच्या १८,००० रिकाम्या जागांचे काय करायचे ?

**मुंबई, प्रतिनिधी**

नीट-पीजी उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेली किमान पर्सेंटाईल मर्यादा अनेक प्रवर्गांमध्ये मोठ्या प्रमाणावर कमी करून शून्यापर्यंत आणण्यात आली आहे. परिणामी, निगेटिव्ह किंवा अत्यंत कमी गुण मिळविलेले उमेदवार देखील केवळ रँक आणि पसंतीच्या आधारे पदव्युत्तर शिक्षणासाठी पात्र ठरत आहेत. सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा बोर्ड यांचे म्हणणे आहे की, इतक्या मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त राहिल्यास प्रशिक्षण क्षमता, सार्वजनिक गुंतवणूक आणि रुग्णसेवा या सर्वांचा अपव्यय होतो.

नीट पीजी ही परीक्षा एमबीबीएस नंतरच्या स्पर्धात्मक निवडीसाठी आहे. मात्र पात्रतेची किमान मर्यादा शून्यावर नेल्याने 'फक्त परीक्षा देणे' हाच प्रवेशाचा निकष ठरत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. निगेटिव्ह गुण असूनही पीजीमध्ये प्रवेश मिळू शकतो, हे चित्र ज्ञान, कौशल्य आणि तयारीपेक्षा जागा भरण्याला प्राधान्य दिले जात असल्याचा संदेश देते. राष्ट्रीय पातळीवरील डॉक्टर संघटनांनी हा निर्णय शैक्षणिक व नैतिकदृष्ट्या अयोग्य असल्याचे सांगत भविष्यातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या गुणवत्तेबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

गुणवत्तेच्या खालच्या स्तरावर असलेले विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर पीजीमध्ये दाखल झाल्यास शैक्षणिक मानदंड, संशोधनाची गुणवत्ता आणि रुग्णसेवा कौशल्य यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. आधीच प्रचंड तणावाखाली असलेल्या रुग्णालयांमध्ये शिक्षकांना मूलभूत पातळीपासून प्रशिक्षण द्यावे लागेल, अशी भीती व्यक्त होत आहे. दीर्घकाळात याचा परिणाम तज्ज्ञ डॉक्टरांच्या सामाजिक प्रतिमेवर आणि भारतीय वैद्यकीय पदव्यांच्या आंतरराष्ट्रीय विश्वासार्हतेवर होऊ शकतो.

नीट पीजीचा मूळ हेतू 'योग्यतेचा किमान स्तर' निश्चित करणे हा आहे. तोच स्तर शून्यावर आणणे म्हणजे संपूर्ण प्रणालीची विश्वासार्हता धोक्यात घालणे होय. रिक्त जागा हा गंभीर प्रश्न आहे; पण त्यावर उपाय म्हणून मानदंड नव्हे, तर व्यवस्थापन आणि नियोजन बदलणे ही अधिक दूरदृष्टीची दिशा ठरू शकते. वैद्यकीय शिक्षणातील कोणताही धोरणात्मक निर्णय रुग्णहित, शैक्षणिक गुणवत्ता आणि सामाजिक न्याय या तीन स्तंभांचा समतोल राखूनच घ्यायला हवा. अन्यथा आजचा सोपा वाटणारा निर्णय उद्याच्या पिढ्यांसाठी महागात पडू शकतो. सरकारने रिक्त पीजी जागा भरण्यासाठी हा अशैक्षणिक पवित्रा घेतला असला, तरी त्या जागा गुणवत्तापूर्ण विद्यार्थी, योग्य शिक्षक आणि रुग्णसंख्या यांच्या त्रिकोणाशिवाय भरून काढणे, हे फक्त संख्यात्मक यश ठरेल; गुणवत्तात्मक नव्हे.

वैद्यकीय संघटनांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, कमी गुण मिळालेल्या उमेदवारांना थेट तज्ज्ञ प्रशिक्षणात प्रवेश देणे हे रुग्णसुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते. गरीब व असुरक्षित रुग्ण प्रामुख्याने सरकारी रुग्णालयांवर अवलंबून असतात. अशा ठिकाणीच कमी तयारीचे विद्यार्थी प्रशिक्षणात येण्याची शक्यता अधिक असल्याचा आरोप केला जात आहे. डॉक्टरांविषयी वाढत असलेला अविश्वास, वैद्यकीय चुकांवरील संवेदनशीलता आणि न्यायालयीन खटले यांचा विचार करता हा निर्णय अत्यंत नाजूक ठरतो.

अनेक तज्ज्ञांचे मत आहे की, रिक्त जागांसाठी केवळ कट-ऑफ जबाबदार नाही. शाखांचे असंतुलित नियोजन, अतिशय जास्त फी, काही विषयातील अतोनात कामाचा ताण आणि करिअरचा अस्पष्ट मार्ग हीदेखील महत्त्वाची कारणे आहेत. प्रवेश मानदंड शिथिल करण्याऐवजी सीट्सचे पुनर्वाटप, फी-रचनेचे पुनरावलोकन, बाँड धोरणात सुधारणा आणि कामाच्या परिस्थितीत बदल हे अधिक शाश्वत उपाय ठरले असते.

# "बिहार भवन उभारणारच!"

## बिहारच्या मंत्र्यांचे थेट राज ठाकरेंना आव्हान

**मुंबई, प्रतिनिधी**

दक्षिण मुंबईतील पोर्ट ट्रस्टच्या जागेवर प्रस्तावित ३० मजली 'बिहार भवन' आता केवळ बांधकामाचा विषय राहिलेला नसून, तो महाराष्ट्र–बिहार राजकीय टोकदार संघर्षाचा केंद्रबिंदू ठरताना दिसत आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनाने या बिहार भवनाला जोरदार विरोध केल्यानंतर आता बिहार सरकारमधील ज्येष्ठ मंत्री अशोक चौधरी यांनी थेट मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनाच आव्हान दिल्याने वाद विकोपाला गेला आहे.

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या जनता दल (युनायटेड) पक्षाचे नेते असलेले अशोक चौधरी यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "कोणाच्याही दबावाला न जुमानता मुंबईत बिहार भवन उभारले जाणारच." त्यांच्या या वक्तव्यामुळे मुंबईतील राजकीय वातावरण तापले असून, मनसेने अधिक आक्रमक भूमिका घेण्याचे संकेत दिले आहेत.

बिहार भवनाला होत असलेल्या विरोधावर संताप व्यक्त करत अशोक चौधरी म्हणाले, "हा देश कुणाची जहागिरी आहे का? 'बनू देणार नाही' असं म्हणणारे कोण आहेत? राज ठाकरे महाराष्ट्राचे राजे आहेत का? फालतू गोष्टी सुरू आहेत."

हे बिहार भवन उपचारांसाठी महाराष्ट्रात येणाऱ्या बिहारच्या नागरिकांसाठी उभारण्यात येत असून, ते कोणत्याही राजकीय अजेंड्याचा भाग नसून मानवी गरजांपोटी उभारले जात असल्याचा दावाही त्यांनी केला.

**मनसेचा आक्रमक प्रतिवाद**

बिहारच्या मंत्र्यांनी थेट राज ठाकरेंचे नाव घेतल्याने मनसेत तीव्र संतापाची लाट उसळली आहे. मनसे नेत्यांनी स्पष्ट भूमिका घेत म्हणाले की, "मुंबईत बिहार भवन बांधण्यापेक्षा बिहार सरकारने त्यांच्या राज्यातच रुग्णांसाठी दर्जेदार आरोग्य सुविधा उभ्या कराव्यात. आम्ही मुंबईत बिहार भवन होऊ देणार नाही."

मनसेचे नवनिर्वाचित नेते यशवंत किल्लेदार यांनीही कडाडून विरोध करत सांगितले, "महागाई वाढली आहे, मुंबईतील नागरिकांचे प्रश्न प्रलंबित आहेत. त्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून दुसऱ्या राज्यासाठी इथे पैसा खर्च करण्यापेक्षा बिहारमध्येच गुंतवणूक करा."

**संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे**

एका बाजूला बिहार सरकारचा 'भवन उभारणारच' असा ठाम निर्धार, तर दुसऱ्या बाजूला मनसेचा 'मुंबईत होऊ देणार नाही' असा आक्रमक पवित्रा — यामुळे येत्या काळात हा मुद्दा मोठ्या राजकीय आंदोलनात परिवर्तित होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पोर्ट ट्रस्टच्या जागेवरील बिहार भवनाचा प्रश्न आता प्रादेशिक अस्मिता, राज्यांतील अधिकार आणि मुंबईवरील हक्क या मुद्द्यांभोवती फिरू लागला असून, या संघर्षावर राज्य आणि केंद्र सरकारची भूमिका काय असते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जे.जे. रुग्णालयातील 'असंवेदनशील' कारभारावर चाबूक

## दोषी कर्मचाऱ्यांच्या चौकशीसाठी समिती तैनात

**मुंबई, प्रतिनिधी**

राज्यातील सर्वात मोठे सरकारी रुग्णालय असलेल्या जे.जे. रुग्णालयातील (ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय) समाजसेवा विभागाचा 'असंवेदनशील' कारभार अखेर चव्हाट्यावर आला आहे. रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना मिळणाऱ्या हीन वागणुकीबाबत प्राप्त झालेल्या गंभीर तक्रारींची दखल घेत, रुग्णालय प्रशासनाने या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे. या कारवाईमुळे रुग्णालयातील कामचुकार कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

**आमदारांच्या पत्राने उडाली खळबळ**

चिपळूण - संगमेश्वर मतदारसंघाचे आमदार शेखर निकम यांनी या प्रकरणी थेट अधिष्ठात्यांकडे धाव घेतली होती. रुग्णालयातील, विशेषतः समाजसेवा विभागातील काही कर्मचारी अत्यंत बेजबाबदारपणे वागत असून, ते रुग्णांच्या अडचणी समजून घेण्याऐवजी त्यांना मनस्ताप देत असल्याचा आरोप आमदार निकम यांनी पत्राद्वारे केला होता. या पत्राची दखल घेत प्रशासनाने ही तातडीची कारवाई केली आहे.

केवळ गैरवर्तनाची चौकशीच नाही, तर समाजसेवा विभागातील कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबतही संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे या विभागातील कर्मचाऱ्यांचा मागील एका वर्षाचा बायोमेट्रिक अहवाल सादर करण्याचे आदेश अधिष्ठाता डॉ. अजय भंडारवार यांनी दिले आहेत. तसेच, ज्या कर्मचाऱ्यांविरुद्ध यापूर्वी शिस्तभंगाची कारवाई झाली आहे, त्यांचाही सविस्तर इतिहास ही समिती तपासणार आहे.

**चौकशी समितीचे स्वरूप**

मुख्य प्रशासकीय अधिकारी सचिन नागोराव अन्नपुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करणार असून, त्यात सदस्य सचिव म्हणून डॉ. अश्विनी जाधव (प्राध्यापक) आणि सदस्य म्हणून संतोष महादेव गोसावी (प्रशासकीय अधिकारी) यांचा समावेश आहे. समितीला या प्रकरणाचा सखोल तपास करून तातडीने अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

**"रुग्णांची सेवा हेच आमचे प्रथम कर्तव्य आहे. यात कुचराई करणाऱ्या किंवा नातेवाईकांशी गैरवर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यांची गय केली जाणार नाही. चौकशी अहवालानुसार दोषींवर कडक कारवाई केली जाईल."**

**- प्रशासन, जे.जे. रुग्णालय**



# मुंबईत 'वारणा आईस्क्रीम' चा दिमाखदार शुभारंभ

## तीन वर्षात तीन हजार विक्री केंद्राचे उद्दिष्ट- आमदार डॉ.विनय कोरे




**वारणा आईस्क्रीम च्या शुभारंभ प्रसंगी संघाचे कार्यकारी संचालक सुधीर कामेरिकर,मुंबई विभागाचे जनरल मॅनेजर ए.के.सिंग एस ए तासकर,एन. बी. ढमाळ, मार्केटिंग मॅनेजर अनिल हेर्ले, श्रीधर बुधाले,**

**नवी मुंबई, प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रातील अग्रगण्य नाव असलेल्या वारणा समूहाने आता आईस्क्रीम क्षेत्रात दमदार पाऊल टाकले असून मुंबई येथे 'वारणा आईस्क्रीम' चा दिमाखदार शुभारंभ करण्यात आला.

नवी मुंबईतील तुर्भे येथे वारणा आईस्क्रीमच्या उद्घाटन निमित्ताने संघाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे म्हणाले की, वारणा दुधाच्या गुणवत्तेवर ग्राहकांचा विश्वास आहेच, आता तोच दर्जा आईस्क्रीमच्या माध्यमातून घराघरांत पोहोचवला जाईल. वारणा ब्रँड पदार्थाची शुद्धता आणि ग्राहकांची विश्वासार्हता जपण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुंबई शाखेने सध्या ११ वितरकांमार्फत काम सुरू केले असून, लवकरच ही संख्या २५ वर नेण्यात येणार आहे. सध्या ३०० दुकानांतून विक्री सुरू होत असून पुढील तीन वर्षांत संपूर्ण मुंबईत ३००० विक्री केंद्रे सुरू करण्याचा मानस व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे. यावेळी संघाचे कार्यकारी सुधीर कामेरिकर यांनी मुंबईत ५० नव्या फ्रँचायझी आणि मेट्रो स्टेशन्सवरील शॉप मध्येही वारणा आइसक्रीम उपलब्ध होणार आहेत. पहिल्या वर्षात १५ कोटींच्या विक्रीचे उद्दिष्ट असल्याची माहिती दिली.

बटरस्कॉच, चोको चिप्स, चॉकलेट, केशर पिस्ता, मॅंगो, पिस्ता, व्हॅनिला, काजु किशमीश, स्पॉयसी गव्हा, राजभोग अमेरीकन नट, अफगाण ड्रायफूट, बेल्जियम चॉकलेट या फ्लेवर्स मध्ये आईसक्रीम उपलब्ध आहेत. सुरुवातीला चर्चगेट ते विरार, कुलाबा ते कर्जत, सीएसएमटी ते पनवेल उरण व रायगड जिल्हा या विभागात प्राधान्याने विक्री सुरू करण्यात येणार आहे याबरोबरच महाराष्ट्रातील सर्व मोठ्या शहरात वारणा आईसक्रीम विक्रीस उपलब्ध करणार असल्याचे मुंबई विभागाचे जनरल मॅनेजर मार्केटिंग ए.के. सिंग यांनी सांगितले.

यावेळी कार्यक्रमास असि. जनरल मॅनेजर एस ए तासकर, मुंबई विभागीय मॅनेजर एन.बी. ढमाळ, मार्केटिंग मॅनेजर अनिल हेर्ले, असि. मार्केटिंग मॅनेजर आर. व्ही.देसाई, फॅक्टरी मॅनेजर, श्रीधर बुधाले,असि. मॅनेजर प्रोडक्शन प्रीतिन बासटवार, मॅनेजर पंकज वाणी,अधिकारी अशोक नांगरे, वारणा डेअरी आणि ॲग्रो इंडस्ट्रीजचे जनरल मॅनेजर युवराज मुळीक, फॅक्टरी मॅनेजर अनिकेत देशमुख, मार्केटिंग ऑफिसर, कर्मचारी व वितरक आदी उपस्थित होते.

# वारंवार एकत्र राहण्याला 'विवाह' म्हटले जाऊ शकते !

## उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा

**मुंबई, प्रतिनिधी**

वारंवार एकत्र राहणे तसेच मुलाचा जन्म होणे या गोष्टींमुळे निर्माण झालेले दीर्घकालीन घनिष्ठ नाते याला 'विवाह' म्हटले जाऊ शकते, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला आहे.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्यांतर्गत व खटला रद्द करण्याची विनंती करीत पुरुषाने न्यायालयाचे दार ठोठावले होते. तथापि, विवाहाचे नाते नाकारण्याचा याचिकाकर्त्याचा दावा न्यायालयाने फेटाळला आणि कौटुंबिक हिंसाचाराचा खटला रद्द करण्यास स्पष्ट नकार दिला. प्रलंबित महिलेवर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणातील आरोपी व त्याच्या कुटुंबीयांनी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांपुढे असलेली कार्यवाही रद्द करण्याची विनंती न्यायालयाला केली होती. तसेच २०२२ आणि २०२३ मध्ये पत्नीला आणि अल्पवयीन मुलीला पोटगी देण्याचे आदेश रद्द करण्यासाठी आरोपीने न्यायालयात धाव घेतली होती. त्याच्या याचिकेवर न्या. एम. एम. नेरळीकर यांनी सुनावणी घेतली. महिलेने दाखल केलेल्या तक्रारीवरून याचिकाकर्ता त्याच्या कुटुंबीयांविरोधात कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत खटला दाखल करण्यात आला होता. न्या. नेरळीकर यांनी याचिकाकर्त्याला दिलासा नाकारला. मात्र आरोपीचे पालक व त्याच्या पत्नीला दिलासा दिला. महिलेने आरोपीसोबतच्या दीर्घकालीन घनिष्ठ नात्याच्या आधारे कौटुंबिक हिंसाचाराचा आरोप केला होता आणि पोटगीसाठी दंडाधिकारी न्यायालयात दाद मागितली होती. महिलेच्या म्हणण्यानुसार, ती व आरोपीमध्ये शारीरिक संबंध झाले होते. त्यातून ती गर्भवती राहिली होती. असे असूनही आरोपीने नंतर लग्नाला नकार दिला आणि दुसऱ्या महिलेशी लग्न केले होते. त्यानंतर महिलेने आरोपीविरुद्ध ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत आणि बलात्काराचा आरोप करीत एफआयआर दाखल केला होता.

# सागर गोरखे, रमेश गायचोर यांना जामीन मंजूर

**मुंबई, प्रतिनिधी**

शहरी नक्षलवादप्रकरणी अटकेत असलेल्या दोन आरोपींना उच्च न्यायालयाने दिलासा दिला. न्या. अजय गडकरी आणि न्या. श्याम चांडक यांच्या खंडपीठाने आरोपींना कोणत्याही खटल्याविना दीर्घकाळ कारागृहात ठेवता येणार नाही, असे स्पष्ट करत कबीर कला मंचशी संबंधित सागर गोरखे आणि रमेश गायचोर यांना ५ वर्षांच्या कारावासानंतर एक लाखाचा जामीन मंजूर केला.

१ जानेवारी २०१८ रोजी पुण्यातील कोरेगाव-भीमा येथे घडलेल्या घटनेनंतर राज्यभरात दंगल उसळली होती. त्याच्या पूर्वसंध्येला ३१ डिसेंबर २०१७रोजी पुण्यात झालेल्या एल्गार परिषदेच्या कार्यक्रमात सहभाग असल्याचा आरोप करत दिल्ली विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक हानी बाबू आणि कबीर कला मंच या सांस्कृतिक गटाचे तीन सदस्य सागर गोरखे, रमेश गायचोर आणि ज्योती जगताप यांना अटक करण्यात आली होती. मुख्य आरोपी आणि नक्षलवादी नेता मिलिंद तेलतुंबडेने कबीर कला मंचच्या या सदस्यांशी चर्चा केली होती. तसेच या तिघांनी अन्य व्यक्तींच्या मदतीने एल्गार परिषदेच्या कार्यक्रमात माओवादी विचारसरणीचा प्रसार केल्याचा आरोप राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) केला. या प्रकरणी गेल्याच महिन्यांत प्राध्यापक हनी बाबू यांनाही हायकोर्टाने सशर्त जामीन मंजूर केला.

याच मुद्द्यावर सागर गोरखे, रमेश गायचोर यांनी उच्च न्यायालयात जमिनासाठी याचिका केली. या याचिकेवर न्या. अजय गडकरी आणि न्या. श्याम चांडक यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी आरोपीच्या वतीने ॲड. युग चौधरी यांनी युक्तिवाद करताना शहरी नक्षलवादप्रकरणी एनआयएने अटक केल्यापासून हे आरोपी कोणत्याही खटल्याविना कारागृहात आहेत. त्यांच्याविरुद्धच्या खटल्यात अद्यापपर्यंत कोणतेही आरोपही निश्चित झालेले नाहीत. तपास यंत्रणेला केवळ त्यांना कारागृहात खितपत ठेवायचंय. पण एखाद्या आरोपीला खटल्याविना इतक्या मोठ्या कालावधीसाठी कारागृहात

ठेवणं हे त्याच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन असल्याचे सर्वोच्च न्यायालयानेही याबाबत दिलेल्या अनेक निकालांत स्पष्ट केले, याकडे न्यायालयाचे लक्ष वेधले, तर या खटल्यातील सर्व आरोपीविरोधात गंभीर गुन्ह्याच्या कटात थेट सहभाग असल्याचे पुरावे तपास यंत्रणेकडे उपलब्ध आहेत. इतक्या गंभीर गुन्ह्यांमध्ये केवळ दीर्घ तुरुंगवासाच्या आधारावर जामीन मंजूर करता येणार नाही, असा युक्तिवाद एनआयएच्या वतीने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अनिल सिंह यांनी केला.

# २४०० मिमी अपर वैतरणा जलवाहिनी वळवण्याचे काम पूर्ण

**मुंबई, प्रतिनिधी**

विकास मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या मेट्रो लाइन '७ ए' प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाने (एमएमआरडीए) एक महत्त्वाचा अभियांत्रिकी टप्पा यशस्वीपणे पार केला आहे. या मार्गावरील २४०० मिमी व्यासाच्या अपर वैतरणा पाणीपुरवठा जलवाहिनीचे वळवण्याचे काम पूर्ण झाल्याने या प्रकल्पाला मोठी चालना मिळाली आहे.

एमएमआरडीएने शनिवारी सांगितले की, ही गुंतागुंतीची जलवाहिनी वळवण्याची प्रक्रिया अत्यंत बारकाईने नियोजन करून आणि अचूक अभियांत्रिकी कौशल्याच्या माध्यमातून पार पाडण्यात आली. या कामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) च्या नियोजन विभाग, बाह्य शहर (ट्रंक मेन्स), जल अभियंता कार्यालय तसेच के पूर्व विभाग यांच्यात उत्कृष्ट समन्वय साधण्यात आला. ठरवून दिलेल्या मर्यादित कालावधीतील शटडाऊनमध्ये हे काम पूर्ण करण्यात आले आणि वेळेत पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात आला. या कामामुळे मेट्रो कॉरिडॉरचे काम वेळेत पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ही युटिलिटी डायव्हर्जन प्रक्रिया मेट्रो लाइन '७ ए' साठी एक महत्त्वाचा टप्पा ठरली आहे. या मार्गावरील अंधेरी (पूर्व) ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ या भुयारी विभागात गेल्या वर्षी जुलैमध्ये अंतिम बोगदा ब्रेकथ्रू साध्य करण्यात आला होता. हा बोगदा 'ध्रुव' नावाच्या टनेल बोरिंग मशीनद्वारे (टीबीएम) खोदण्यात आला असून उत्खनन ४ नोव्हेंबर २०२३ रोजी सुरू झाले होते. अपलाइन बोगद्याची लांबी सुमारे १.६५ किमी आहे.

यापूर्वी, एप्रिल २०२५ मध्ये 'दिशा' या टीबीएमने या कॉरिडॉरवरील पहिला बोगदा ब्रेकथ्रू पूर्ण केला होता. या कॉरिडॉरवर दोन स्थानके असतील. विमानतळ कॉलनी येथे एक उन्नत स्थानक आणि छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एक भुयारी स्थानक. हे भुयारी स्थानक टर्मिनल टी-२ आणि मेट्रो लाइन-३ च्या विमानतळ स्थानकाच्या समांतर असेल. सहार एलिव्हेटेड रोडवरील वाहनांसाठीच्या अंडरपासच्या आधी, विलेपार्ले (पूर्व) येथे हा मार्ग भुयारी होतो. या मेट्रो प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर पूर्वतयारी करण्यात आली आहे. ऑक्टोबर २०२१ मध्ये भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडून जमीन हस्तांतरित करण्यात आली. बामणवाडा आणि वाल्मिकी नगर येथील सुमारे २०० झोपडपट्टीवासीबांचे पुनर्वसन करण्यात आले, तसेच अनेक महत्त्वाच्या विविध यंत्रणांच्या

पाईपलाइन्स वळवण्यात आल्या. यात १८०० मिमी व्यासाच्या सांडपाणी वाहिनीचे मायक्रो-टनेलिंगद्वारे पुनर्संरेखन करून जानेवारी २०२३ मध्ये ती कार्यान्वित करणेही समाविष्ट होते. मेट्रो लाइन '७ ए' हा एमएमआरडीएच्या मुंबई महानगर प्रदेशात ३३७ किमी लांबीचे मेट्रो जाळे उभारण्याच्या व्यापक योजनेचा भाग आहे. सध्या मेट्रो लाइन १, २ ए आणि ७ कार्यरत आहेत, तर मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने शहराची पहिली भुयारी मेट्रो लाइन ३ (आरे ते कुलाबा कफ परेड) सुरू केली आहे.

**मेट्रो '७ ए'ची वाढीव जोड**

मेट्रो लाइन '७ए' ही सध्या कार्यरत असलेल्या रेड लाइन (मेट्रो लाइन ७) ची ३.४ किमी लांबीची वाढीव जोड आहे. ही लाइन अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) दरम्यान धावते. या विस्तारामुळे अंधेरी (पूर्व) बेट आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जोडले जाणार असून पूर्व-पश्चिम दळणवळणात लक्षणीय सुधारणा होणार आहे. हा मार्ग काही प्रमाणात उन्नत (एलिव्हेटेड) तर काही भाग भुयारी असून वेस्टर्न एक्सप्रेस महामार्ग आणि सहार एलिव्हेटेड रोडच्या समांतर जातो.

# राज्यांवरील कर्जाचा बोजा वाढतोय

**मुंबई, प्रतिनिधी**

थेट लाभाच्या योजना, आठव्या वेतन आयोगाची येऊन ठेपलेली अंमलबजावणी, पर्यावरणीय धोक्यात झालेली वाढ, यामुळे देशातील राज्यांवर कर्जाचा बोजा वाढत आहे. राज्यांच्या महसुलाच्या तुलनेत सरासरी कर्जाचे प्रमाण २९.५ टक्क्यांवर गेले आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत राज्यांची वित्तस्थिती काहीशी खालावली आहे. ही वित्तीय असुरक्षिततेची सुरुवात असल्याचा इशारा भारतीय रिझर्व्ह बँकने (आरबीआय) दिला आहे.

आरबीआयच्या राज्य वित्त अभ्यास अहवालात यावर भाष्य करण्यात आले आहे. वाढलेली कर्जपातळी, रोख रकमेच्या हस्तांतरण योजनांची वाढती संख्या, येणारे वेतन आयोग आणि हवामानाशी संबंधित वाढलेले धोके, यामुळे राज्य सरकारच्या मध्यम मुदतीच्या भांडवली खर्चावर दबाव वाढेल, असा स्पष्ट इशारा अहवालात देण्यात आला आहे. भूराजकीय अनिश्चितता, सततची उच्च कर्जपातळी आणि कर्जहमी, रोख हस्तांतरण योजनांमधून वाढणारी आकस्मिक देणी, यांसारख्या घटकांमुळे राज्यांच्या वित्तव्यवस्थेला धोका निर्माण होत असल्याचे अहवालात म्हटले आहे.

कोरोनानंतर राज्यांचे एकत्रित कर्ज-जीडीपी गुणोत्तर उच्च राहिले आहे. हे प्रमाण मार्च २०२६ अखेर राज्यांतर्गत उत्पन्नाच्या २९.२ टक्क्यावर जाईल, असा अंदाज आहे. अनेक राज्यांवरील कर्जाचा बोजा राज्यांच्या सकल उत्पन्नाच्या (जीएसडीपी) ३५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. वित्तीय जबाबदारी आणि अर्थसंकल्प व्यवस्थापन (एफआरबीएम) समितीने केलेल्या २० टक्क्यांच्या शिफारशीपेक्षा हे प्रमाण खूपच जास्त आहे. कर्जाचे प्रमाण अधिक असल्यास व्याजाचा बोजा पडतो. अधिक रक्कम व्याजावर खर्च होते. परिणामी, आवश्यक कामांवरील भांडवली खर्चात कपात केली जाते. परिणामी, मध्यम कालावधीच्या विकास योजना राबविण्यात अडथळा निर्माण होतो.

## महत्त्वाच्या बातम्या

### तोतया रेल्वे अधिकाऱ्याला अटक

**मुंबई, प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या दक्षता पथकाला एका तोतया रेल्वे दक्षता अधिकाऱ्याला पकडण्यात यश आले आहे. बदलीसाठी आणि थकीत वेतन मिळवून देण्यासाठी तोतया अधिकाऱ्यांने रेल्वे कर्मचाऱ्याची फसवणूक केली होती. रेल्वे कर्मचाऱ्याने दक्षता पथकाकडे तक्रार केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी तोतया अधिकाऱ्याला अटक करण्यात आली आहे. रेल्वे बोर्डाचा दक्षता निरीक्षक असल्याची खोटी ओळख दाखवून एका रेल्वे कर्मचाऱ्याकडून पैसे मागणाऱ्या एका व्यक्तीला मध्य रेल्वेच्या दक्षता पथकाने अटक केली आहे.

### गुंतवणुकीच्या बहाण्याने दोघांनी केली ६८ लाखांची फसवणूक

**मुंबई, प्रतिनिधी**

गुंतवणुकीच्या बहाण्याने सीए तरुणासह इतर गुंतवणूकदारांची दोघांनी सुमारे ६८ लाखांची फसवणूक केल्याचा प्रकार गोरेगाव परिसरात उघडकीस आला. याप्रकरणी योगेश खिमजी भानुशाली आणि धवल विमलकांत कक्कड या दोन आरोपीविरुद्ध आरे पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. तक्रारदार सीए असून, त्यांची एक खासगी कंपनी आहे. ते राहात असलेल्या परिसरात योगेश हा राहात असून त्याचा स्वतःचा चप्पल विक्रीचा व्यवसाय आहे. दोन वर्षांपूर्वी त्याने त्यांना शेअरमार्केटच्या आयपीओ गुंतवणुकीबाबत एक माहिती दिली होती. त्याने अनेकांना मार्गदर्शन करून त्यांना शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले आहे. योगेशकडे तक्रारदाराने सुमारे ६८ लाखांची गुंतवणूक केली होती. यावर योगेशने परतावा दिला नाही. विचारणा केल्यानंतर काही दिवसांनी त्यांनी त्यांचे कॉल घेणे बंद केले होते. फसवणुकीचा हा प्रकार लक्षात येताच जयेश सांधा यांनी आरे पोलिसांत तक्रार केली होती.

### दोन घरफोडींच्या गुन्ह्यांत चार आरोपींना माटुंगा, भोईवाडा पोलिसांकडून अटक

**मुंबई, प्रतिनिधी**

जानेवारी महिन्यांत झालेल्या दोन घरफोडींप्रकरणी चार आरोपींना माटुंगा आणि भोईवाडा पोलिसांनी अटक केली. सरुद्दीन ताजुद्दीन शेख, बरकत शफीउल्ला शेख, इस्माईल अस्लम शहा आणि अरबाज इस्माईल शहा अशी या चौघांची नावे आहेत. तक्रारदारांचे दादर येथे कपड्याचे दुकान आहे. अज्ञात चोरट्याने सुमारे ९७ हजारांची कॅश चोरी करून पलायन केले होते. याप्रकरणी पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला होता. ही शोधमोहीम सुरु असताना इस्माईल, अरबाज आणि बरकत या तिघांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय ठाकूर, पोलीस निरीक्षक नितीन महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राहुल चौधरी, अनिल भोंग, पोलीस अंमलदार नथुराम चव्हाण, अविनाश सुतार, प्रदीप राठोड, हेमंत सुळे यांनी काशिमिरा येथून अटक केली. त्यांनीच ही घरफोडी केल्याची कबुली दिली.

### अतिक्रमणांवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष यंत्रणा

**मुंबई, प्रतिनिधी**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापन होऊन कैक वर्षे लोटली तरी अद्याप मुंबई झोपडपट्टीमुक्त झाली नाही. दरवर्षी नव्याने केली जाणारी अतिक्रमणे यामागे कारणीभूत आहेत. त्यामुळे आता अतिक्रमणांवर लक्ष ठेवण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने नेटवर्क फॉर एन्क्रोचमेंट ट्रॅकिंग ॲण्ड रिपोर्टिंग फॉर मुंबई म्हणजेच नेत्रम हे पोर्टल विकसित केले आहे. काही दिवसांपूर्वी नेत्रम पोर्टलची चाचणी घेण्यात आली. यानुसार २०११ ते २०२५ या काळात मुंबईत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाली. मालाडच्या मालवणी भागात हे प्रमाण सर्वाधिक आहे. १५ वर्षांच्या कालावधीत मालवणीतील ६ हेक्टर जागेवर अतिक्रमण करण्यात आले. त्यामुळेच अतिक्रमणांवर लक्ष ठेवणाऱ्या नेत्रम पोर्टलची निर्मिती गुजरातच्या भास्कराचार्य नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर स्पेस ॲप्लिकेशन्स ॲण्ड जिओइन्फर्मेटिक्स या संस्थेच्या मदतीने करण्यात आली. नेत्रम पोर्टलद्वारे मुंबईच्या विविध भागांतील सॅटेलाइट छायाचित्रांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येतो. यात असे दिसून आले आहे की, मालाड मालवणी, पहाडी गोरेगाव, देवनार, मानखुर्द, कुर्ला, मिठागरांच्या जागा या ठिकाणी सर्वाधिक अतिक्रमण झाले आहे. मालवणीत ६.१४ हेक्टर, पहाडी गोरेगावमध्ये १ हेक्टर, आकुर्ली येथे ५.९८ हेक्टर, देवनार येथे ३.१ हेक्टर इतकी जागा अतिक्रमणांनी व्यापली आहे. नव्याने होणाऱ्या अतिक्रमणांवर यापुढे कठोर कारवाई केली जाणार आहे.

### कशेळी-मुलुंड जलबोगद्यासाठी सीआरझेडची मान्यता

**मुंबई, प्रतिनिधी**

ठाण्यातील येवई आणि कशेळीला पूर्व उपनगरातील मुलुंडशी जोडणाऱ्या पालिकेच्या महत्त्वाकांक्षी २१ किमी लांबीच्या जलवाहतूक बोगद्याच्या प्रकल्पाला अखेर कोस्टल रेग्युलेशन झोन (सीआरझेड) कडून मंजुरी मिळाली आहे. या मंजुरीमुळे मुंबईकरांची वाढती पाण्याची मागणी पूर्ण होण्यास मदत होणार आहे. प्रस्तावित कशेळी-मुलुंड बोगदा मुंबई-नाशिक महामार्ग विस्ताराला पूरक ठरेल. पालिका येवई जलाशय ते कशेळीपर्यंत एक बोगदा देखील बांधणार आहे. मार्च २०२४ मध्ये, १४ किमी लांबीच्या येवई-कशेळी बोगदा आणि ७किमी लांबीच्या कशेळी-मुलुंड बोगद्यासाठी निविदा काढण्यात आल्या होत्या. ज्या दोन्ही सहा ते सात वर्षांत पूर्ण होण्याची अपेक्षा होती. तथापि, हा प्रकल्प पर्यावरणीय मंजुरीच्या प्रतीक्षेत होता. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने कशेळी, भिवंडी ते मुलुंड ऑक्ट्रोई नाकापर्यंतच्या बीएमसीच्या जलमार्ग प्रकल्पासाठी सीआरझेड मंजुरी दिली आहे. नवीन पायाभूत सुविधांची क्षमता जास्त असेल आणि गळती आणि प्रदूषण कमी करण्यासाठी डिझाइन केलेली असेल, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

### आदिवासी समाजाच्या मागण्यांसाठी मुंबई महापालिकेवर मोर्चा

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पात आदिवासी समाजासाठी तरतूद केलेला राखीव १५ टक्के निधी द्यावा या मागणीसाठी महापालिकेवर मोर्चा काढणार असल्याची माहिती कष्टकरी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठल लाड यांनी शनिवारी मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. मुंबई शहरात सरकारी सर्व्हेप्रमाणे २२२ आदिवासी गावे आहेत. बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, आरे दुग्ध वसाहत, चित्रनगरी, गोराई गाव, मढ आयलंड, मुलुंड, भांडुप, पवई या गावांचा समावेश आहे. २०११ च्या भारतीय जनगणनेनूसार आदिवासी समाजाची लोकसंख्या सुमारे ६ लाख इतकी आहे. आज हा समाज उपेक्षित जीवन जगत आहेत. वन हक्क कायदा २००६ लागू असतानाही आदिवासींना वनपट्टे व गावठाणे व इतर वन हक्क नाकारले जात आहेत. सर्व शासकीय विभाग आदिवासी समाजावर अन्याय करीत आहेत, असे लाड यावेळी म्हणाले.

### प्राध्यापकाची हत्या, आरोपीस पोलीस कोठडी

**मुंबई, प्रतिनिधी**

क्षुल्लक वादातून आलोककुमार सिंग (३०) या कॉलेज प्राध्यापकाची अज्ञात व्यक्तीने हत्याराने वार करून हत्या केल्याची घटना शनिवारी सायंकाळी मालाड रेल्वे स्थानकात घडली. हत्येप्रकरणी आरोपी ओंकार एकनाथ शिंदे याला पश्चिम उपनगरातील कुरार परिसरातून अटक करण्यात आली. आलोककुमार विलेपार्ले येथील एन. एम. कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. ते त्यांच्या कुटुंबियांसोबत कांदिवली परिसरात राहात होते. शनिवारी सायंकाळी ते विलेपार्ले येथून कांदिवलीतील घरी जाण्यासाठी निघाले होते. बोरिवली लोकलने प्रवास करताना त्यांचा एका सहप्रवाशासोबत क्षुल्लक कारणावरून वाद झाला होता. या वादातून त्याने त्यांच्यावर हत्याराने वार केले. त्यात ते गंभीर जखमी झाले. त्यामुळे त्यांना कांदिवलीतील शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथे त्यांना डॉक्टरांनी मृत्त घोषित केले. दरम्यान, बोरिवली रेल्वे पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी बोरिवली रेल्वे पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला. आरोपी गर्दीचा फायदा घेत घटनास्थळावरून पळून गेला, परंतु सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने त्याची ओळख पटवून त्याला अटक करण्यात आली, त्याला ३० जानवारीपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

## संपादकीय

### संविधानाप्रती राजकीय जागरूकता अपुरी

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. ब्रिटिश सत्तेतून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताच्या नेतृत्वाने भावी पिढ्यांच्या शासन-प्रशासनासाठी संविधानाची निर्मिती केली. संविधान सभेच्या बैठकांना दोन वर्षे, अकरा महिने आणि अठरा दिवस लागले. त्यातून आपल्याला जगातील सर्वात विस्तृत संविधान प्राप्त झाले. ९ डिसेंबर १९४६ पासून २६ नोव्हेंबर १९४९ पर्यंत संविधान निर्मात्यांनी भारताच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय जीवनातील विविध पैलूंवर सखोल चर्चा केली. त्यांनी जगातील अनेक विद्यमान संविधानांचा सखोल अभ्यास केला आणि त्यातील सर्वोत्तम व स्वीकारार्ह घटक भारतीय संविधानात समाविष्ट केले. त्यामुळे भारतीय संविधान हे जगातील उत्कृष्ट लोकशाही संस्था व परंपरांचे सुसंगत मिश्रण ठरले. संविधाननिर्मितीत सहभागी असलेल्या सुमारे ३०० व्यक्तींवर नजर टाकल्यास लक्षात येते की त्या काळातील भारतातील सर्वोत्तम बुद्धिमत्ता, विद्वत्ता आणि प्रतिभा संविधान सभेत एकत्र आली होती. ही सभा विविध विचारधारा, प्रदेश, श्रद्धा, भाषा, व्यवसाय, समाजघटक, पंथ, राजकीय व्यवस्था आणि आवडी यांचे प्रतिनिधित्व करणारी होती. येथे राजकारणी, साहित्यिक, लेखक, कादंबरीकार, तत्त्वज्ञ, वकील, डॉक्टर, शेतकरी, आदिवासी अशा सर्व प्रकारचे लोक होते. प्रत्येक शब्द, प्रत्येक कलम, प्रत्येक संस्था आणि प्रत्येक नियमावर सखोल व गंभीर चर्चा-वादविवाद करण्यात आले. याच प्रक्रियेचा परिणाम म्हणजे भारतीय संविधान आपल्या प्रस्तावनेतच आपल्या तात्त्विक मूल्यांची आणि व्यावहारिक आधाराची स्पष्ट घोषणा करते. ते एक संपूर्ण प्रभुत्वसंपन्न, लोकशाही गणराज्य स्थापन करण्याचा संकल्प व्यक्त करते. नंतर १९७६ मध्ये अंतर्गत आणीबाणीच्या काळात 'धर्मनिरपेक्ष' आणि 'समाजवादी' हे शब्द त्यात जोडले गेले. हे संविधान भारतातील सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय, तसेच विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, विश्वास आणि उपासनेचे स्वातंत्र्य, तसेच दर्जा व संधीची समानता सुनिश्चित करण्यास कटिबद्ध आहे. नागरिकांमध्ये बंधुता निर्माण करणे आणि देशाची राष्ट्रीय एकता व अखंडता अबाधित राखणे हा त्याचा उद्देश आहे. भारतीय संविधान हे कठोरता आणि लवचिकता यांच्या संमिश्रणाचे उदाहरण आहे. काळानुसार बदलणाऱ्या गरजा आणि अपेक्षांनुसार स्वतःमध्ये बदल करण्याची त्याची क्षमता आहे. विविध तरतुदी आणि उपबंधांद्वारे ते सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन बनले आहे. देशाच्या प्रशासनासाठी ते मुख्य मार्गदर्शक आधार असून सर्व राजकीय व शासकीय संस्थांना दिशा देणारे साधन आहे. ते एकीकडे भारतीय सांस्कृतिक परंपरेचे संरक्षण करते, तर दुसरीकडे आधुनिकतेच्या अपेक्षांनाही योग्य तो मान देते. भारतीय संविधान आपल्या ३९५ कलमांद्वारे, २२ भागांद्वारे आणि १२ अनुसूच्यांद्वारे भारतीय समाजातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रश्नांना स्पर्श करते. सुमारे सव्वाशे घटनादुरुस्त्यांद्वारे संविधानाने स्वतःला नव्या गरजांनुसार सतत अद्ययावत केले आहे. समानता, स्वातंत्र्य, अभिव्यक्ती, धार्मिक श्रद्धा यांसारखे मूलभूत अधिकार नागरिकांना संविधानातूनच प्राप्त होतात. या अधिकारांचे संरक्षण करण्याची जबाबदारी संविधानाने भारतीय न्यायपालिकेकडे सोपवली आहे. भारतातील स्वतंत्र न्यायपालिका संविधानाचे अर्थस्पष्टीकरण आणि संरक्षण करण्याच्या अधिकाराने संपन्न आहे. नागरिकतेसंबंधी प्रश्नही संविधानच हाताळते. स्वतंत्र व निष्पक्ष निवडणूक आयोगाची संकल्पना ही घटनात्मक लोकशाहीची एक महत्त्वाची हमी आहे. तसेच देशाच्या वित्तीय रचनेचे, कार्यपद्धतीचे आणि व्यवहारांचे स्वायत्त निरीक्षण व लेखापरीक्षण करण्यासाठी नियंत्रक व महालेखापरीक्षक यांची व्यवस्था देखील संविधानाने केली आहे. राज्याने आपल्या धोरणनिर्मिती प्रक्रियेत कोणती मूल्ये आणि तत्त्वे ध्यानात घ्यावीत, यासाठी राज्याच्या धोरणनिर्देशक तत्त्वांची तरतूद करण्यात आली आहे. संसदीय व्यवस्थेअंतर्गत विविध संस्था, साधने, प्राधिकरणे आदींची रचना करत भारतीय संविधान आधुनिक भारताचे सर्वोच्च धोरणग्रंथ आणि मार्गदर्शनकेंद्र बनले आहे. आधुनिक काळात २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा करण्याची घोषणा झाल्यानंतर गेल्या सुमारे दशकभरात भारतीय संविधानाबाबतची जागरूकता वाढली आहे. प्रजासत्ताक दिनीही आपण आपल्या संविधान निर्मात्यांचे श्रद्धेने स्मरण करतो. तसेच या दिवशी संविधानाप्रती आपला सन्मान आणि निष्ठा यांची शपथही घेतो. तरीदेखील बहुतांशी वेळा संविधानाला केवळ कायदा, न्यायालये, राज्यशास्त्र आणि राजकारण यांच्यापुरतेच मर्यादित मानले जाते.

### ट्रम्पचा पुढचा डाव काय?

3 जानेवारीच्या पहाटे अमेरिकेच्या विशेष दलांनी व्हेनेझुएलाच्या राष्ट्रपती भवनावर धाड टाकली. ट्रम्प यांच्या दोन्ही राष्ट्राध्यक्षीय कार्यकाळांतील अतिशय धाडसी पावलांपैकी हे एक पाऊल मानले जाते. या कारवाईत व्हेनेझुएलाचे हुकूमशहा निकोलस मादुरो आणि त्यांची पत्नी यांना अटक करून न्यूयॉर्कला नेण्यात आले, जिथे त्यांच्यावर गुन्हेगारी खटले चालवले जाणार आहेत. ट्रम्प यांच्या म्हणण्यानुसार, या दोघांवर अमेरिकेविरोधात प्राणघातक नार्को दहशतवाद चालविल्याचे आरोप ठेवण्यात आले आहेत. या घटनेमुळे ट्रम्प प्रशासन इतर अडचणीच्या देशांविरुद्ध शक्तीचा वापर करताना कोणती भूमिका घेईल, याबाबत महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्याचबरोबर एक वेगळाच धोरणात्मक प्रश्नही पुढे येतो. सध्याचे अमेरिकन राष्ट्राध्यक्ष गेल्या अनेक वर्षांपासून ग्रीनलँड ताब्यात घेण्याची इच्छा व्यक्त करत आले आहेत. त्यामुळे त्या आर्क्टिक बेटाने काळजी करावी का, असा प्रश्न उपस्थित होतो. कदाचित करावी, मात्र लगेच अमेरिकन लष्करी आक्रमण होणार आहे म्हणून नव्हे. डेन्मार्क सरकार पूर्णपणे अस्वस्थ आणि चिंतेत आहे. ग्रीनलँड हे डेन्मार्कचे अर्धस्वायत्त क्षेत्र असल्यामुळे, ट्रम्प खरोखरच त्या बेटाविरुद्ध लष्करी शक्ती वापरण्याचा निर्णय घेतील की काय, याबाबत त्यांना तीव्र काळजी वाटत आहे. ग्रीनलँड आपल्या ताब्यात घेण्याची ट्रम्प यांची इच्छा नवी नाही. 2019 मध्ये त्यांनी पहिल्यांदा ही कल्पना मांडली होती आणि ग्रीनलँड विकत घेण्याची ऑफरही दिली होती. मात्र, ग्रीनलँड विक्रीसाठी नाही, असे त्यांना स्पष्टपणे सांगण्यात आले. 2025 च्या सुरुवातीला हा मुद्दा पुन्हा पुढे आला, तेव्हा ग्रीनलँडवर अमेरिकेचे नियंत्रण असणे आवश्यक असल्याचे संकेत देण्यात आले आणि त्यासाठी लष्करी शक्ती वापरण्याची शक्यता पूर्णपणे नाकारण्यात आली नाही. मागील वर्षभर जेडी व्हॅन्स यांच्या ग्रीनलँड दौऱ्याला मिळालेल्या थंड प्रतिसादानंतर ही कल्पना मागे पडल्यासारखी वाटत होती, पण ती पूर्णपणे संपलेली नव्हती. व्हेनेझुएलातील लष्करी कारवाईनंतर काही तासांतच ट्रम्प यांनी पत्रकारांना सांगितले की अमेरिकेला राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने ग्रीनलँडची गरज आहे आणि ते अत्यंत धोरणात्मक ठिकाण आहे. याचबरोबर व्हाइट हाऊसचे धोरणविषयक उपमुख्य कर्मचारी आणि मातृभूमी सुरक्षा सल्लागार स्टीफन मिलर यांनीही असे म्हटले की ग्रीनलँडच्या भविष्यासाठी अमेरिकेशी कोणीही लढणार नाही. या पार्श्वभूमीवर डेन्मार्क सरकार पूर्णपणे चिंतेत आहे. ग्रीनलँड हे डेन्मार्कचे अर्धस्वायत्त क्षेत्र असल्यामुळे, ट्रम्प खरोखरच त्या बेटाविरुद्ध लष्करी शक्ती वापरण्याचा निर्णय घेतील का, याची त्यांना तीव्र भीती वाटत आहे. तरीही, हा पर्याय अद्याप फारसा शक्य वाटत नाही. सर्वप्रथम, ग्रीनलँडची तुलना व्हेनेझुएलाशी करता येत नाही. ग्रीनलँडचा भौगोलिक आणि राजकीय संदर्भ वेगळा असून त्यासाठी स्वतंत्र धोरणात्मक दृष्टिकोन आवश्यक आहे. दक्षिण अमेरिकेबाबत प्रशासन जे तर्क वापरते, ते येथे लागू होत नाहीत. नोव्हेंबर 2025 मध्ये जाहीर झालेल्या नॅशनल सिक्युरिटी स्ट्रॅटेजीत अमेरिकेने पश्चिम गोलार्धावर नियंत्रण ठेवण्याची गरज अधोरेखित केली आहे, ज्याला ट्रम्प "डॉनरो डॉक्ट्रिन" असे संबोधतात. यावरून असे दिसते की पश्चिम गोलार्धात वर्चस्व मिळवण्यासाठी हे प्रशासन मोठे धोके पत्करू शकते, पण युरोपमध्ये, विशेषतः नाटोच्या सहयोगी देशाबाबत, अशी जोखीम घेण्याची त्यांची तयारी कमी असण्याची शक्यता आहे. याच आठवड्यात बंद दाराआड झालेल्या संसदीय बैठकीत परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांनीही सांगितले की अमेरिका ग्रीनलँड विकत घेऊ इच्छिते, त्यावर आक्रमण करू इच्छित नाही. दुसरे म्हणजे, ग्रीनलँडविरोधातील कोणतीही लष्करी कारवाई देशांतर्गत पातळीवर अत्यंत अप्रिय ठरेल. ती ट्रम्प यांच्या अमेरिका फर्स्ट या भूमिकेशी विसंगत ठरेल आणि ज्या लष्करी हस्तक्षेपवाद्यांवर ते सतत टीका करतात, त्यांच्याच रांगेत त्यांना उभे करेल. कॉंग्रेसमध्येही याबाबत दुर्मिळ अशी द्विपक्षीय सहमती दिसते की लष्करी कारवाई योग्य ठरणार नाही. बायपार्टिझन फ्रेंड्स ऑफ डेन्मार्क कॉकसने दिलेल्या निवेदनात ट्रम्प यांची आक्रमक भाषा रशिया आणि चीनसारख्या अमेरिकेच्या प्रतिस्पर्ध्यांच्या फायद्याची असल्याचे म्हटले आहे. तरीसुद्धा, जरी लष्करी कारवाई प्रत्यक्षात चर्चेबाहेर असली, तरी ट्रम्प प्रशासन त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळाच्या अखेरीपूर्वी ग्रीनलँड मिळवण्याबाबत गंभीर आहे, हे स्पष्ट दिसते. त्यामुळे ग्रीनलँड, डेन्मार्क आणि व्यापक अर्थाने संपूर्ण युरोप यांनी, विशेषतः आपली स्वायत्तता टिकवायची असल्यास, येणाऱ्या तीव्र राजनैतिक आणि राजकीय दबावाला सामोरे जाण्यास तयार राहणे आवश्यक आहे.

# मुंबईत भाजपचा डबल 'एम' डाव



महाराष्ट्रात बीएमसीसह सर्व २९ महानगरपालिकांमध्ये महापौर पदासाठी आरक्षण जाहीर झाले आहे. शहरी विकास राज्यमंत्री माधुरी मिसल यांच्या अध्यक्षतेखाली लॉटरी ड्रॉद्वारे हे निश्चित करण्यात आले की २९ पैकी १५ शहरांमध्ये महिला महापौर असतील. राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या मुंबई, पुणे, नागपूर आणि नाशिकसारख्या शहरांमध्ये भाजपच्या महिला महापौर असतील. देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका मानल्या जाणाऱ्या मुंबई महानगरपालिकेत (बीएमसी) भाजप पहिल्यांदाच सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला आहे.

अशा परिस्थितीत भाजप आपल्या राजकीय इतिहासात प्रथमच स्वतःचा महापौर बनवण्याच्या प्रयत्नात आहे. महापौर पदासाठी झालेल्या आरक्षणाच्या लॉटरी ड्रॉमध्ये बीएमसीला ओपन (महिला) कॅटेगरीत ठेवण्यात आल्याने मुंबईत सलग दुसऱ्यांदा महिला महापौर असतील. आरक्षण जाहीर होताच सर्व महानगरपालिकांमध्ये राजकीय डावपेच आखले जाऊ लागले आहेत. मुंबई, पुणे, नागपूरसह राज्यातील सर्व प्रमुख शहरांमध्ये भाजप 'डबल-एम' (महिला आणि मराठी) हा डाव खेळण्याच्या तयारीत आहे, तर शिंदे गट ठाणे आणि कल्याणसारख्या आपल्या प्रभावक्षेत्रातील शहरांवर वर्चस्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा प्रकारे भाजप केवळ सध्याचे राजकीय समीकरण जुळवण्यापुरते न थांबता भविष्यासाठी मजबूत राजकीय पाया घडवण्याच्या दिशेनेही पावले टाकत आहे. शहरी विकास राज्यमंत्री माधुरी मिसल यांच्या अध्यक्षतेखाली महापौर पदासाठी आरक्षणाचा लॉटरी ड्रॉ पार पडला असून २९ पैकी १५ महानगरपालिकांमध्ये महिला महापौर असतील.

यामध्ये एक महापौर पद अनुसूचित जमाती (एसटी) कॅटेगरीसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. मात्र नियमांनुसार अनुसूचित जमाती (महिला) कॅटेगरीसाठी कोणतेही पद देण्यात आलेले नाही. अनुसूचित जाती (एससी) कॅटेगरीसाठी तीन पदे राखीव असून त्यापैकी दोन पदे अनुसूचित जात (महिला) कॅटेगरीसाठी आहेत. ओबीसी कॅटेगरीसाठी आठ पदे राखीव ठेवण्यात आली आहेत. त्यापैकी चार शहरांमध्ये ओबीसी महिला, तर चार शहरांमध्ये ओबीसी कॅटेगरीतील महिला किंवा पुरुष कोणालाही महापौर होता येईल.



याशिवाय १७ महानगरपालिकांपैकी ९ शहरांमध्ये महापौर पद जनरल कॅटेगरी (महिला) साठी राखीव आहे, तर उर्वरित आठ पदे ओपन (जनरल) कॅटेगरीसाठी ठेवण्यात आली आहेत. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, नवी मुंबई, धुळे, मीरा-भाईंदर, मालेगाव आणि सोलापूर येथे महिला महापौर असतील. तसेच अहिल्यानगर, जळगाव, अकोला आणि चंद्रपूर येथे ओबीसी महिला, तर लातूर आणि जालना महानगरपालिकांमध्ये अनुसूचित जात महिला महापौरासाठी पद राखीव आहे. राज्यातील प्रमुख शहरांची सूत्रे महिलांच्या हाती असणार आहेत. आरक्षणाची स्पष्टता येताच राजकीय गणिते जुळवली जात आहेत.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत राज ठाकरे यांच्या मनसेने उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (यूबीटी) पासून वेगळे होत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेशी हातमिळवणी केली आहे. त्यामुळे कल्याणमध्ये शिंदे गटाचा महापौर होणार आहे. हे पद एसटी कॅटेगरीसाठी राखीव आहे. तसेच शिंदे यांच्या गृहजिल्हा ठाण्यात अनुसूचित जातीचा महापौर असेल, जिथे त्यांच्या पक्षाला महापौर बनवण्याची संधी आहे. मात्र त्यासाठी भाजपच्या पाठिंब्याची गरज भासणार आहे.

महाराष्ट्रातील बहुतांश मोठ्या शहरांमध्ये भाजपचे वर्चस्व निश्चित मानले जात आहे. मुंबई, पुणे, नागपूर आणि नाशिकसह राज्यातील सर्व प्रमुख शहरांमध्ये महिला महापौर असतील. या चारही शहरांमध्ये भाजप आपले महापौर निवडून आणेल. मुंबईत भाजपचा पहिल्यांदाच महापौर निवडला जाईल, तर नागपूर आणि पुण्यात यापूर्वीही भाजपचे वर्चस्व राहिले आहे. नाशिकमध्ये भाजपने ज्या पद्धतीने आपला दबदबा निर्माण केला आहे, त्यामुळे अनेक राजकीय पक्षांचे गणित बिघडले आहे. उत्तर महाराष्ट्रात भाजप आपला राजकीय आधार मजबूत करण्याची ही रणनीती मानली जात आहे. पिंपरी-चिंचवड आणि सांगली येथे ओपन कॅटेगरीचा पर्याय ठेवण्यात आला आहे. उत्तर महाराष्ट्रात नाशिकसह धुळे, जळगाव आणि मालेगाव येथेही महिला महापौर असतील. मालेगाव वगळता उर्वरित तीन शहरांमध्ये भाजप आपले महापौर बनवेल. त्याचप्रमाणे अकोला आणि चंद्रपूर येथे महिला महापौर असतील, तर छत्रपती संभाजीनगर येथे खुल्या श्रेणीसाठी महापौर पद ठेवण्यात आले आहे.

भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेनेला २९ पैकी २३ महानगरपालिकांमध्ये सहजपणे आपले महापौर बनवता येतील, तर कॉंग्रेसला ५ महापौर पदे मिळतील आणि एका शहरात अन्य पक्षाचा महापौर असेल. अशा प्रकारे भाजप 'डबल-एम' म्हणजे महिला आणि मराठी हा राजकीय डाव खेळून आपली समीकरणे अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करीत आहे. भाजप सुमारे २० शहरांमध्ये आपले महापौर बनवण्याच्या स्थितीत आहे, त्यापैकी १० शहरांमध्ये महिला महापौर असतील. महिला महापौरांच्या माध्यमातून अर्ध्या लोकसंख्येला साधण्याची ही रणनीती मानली जात आहे. यासोबतच मराठी कार्ड खेळण्याचीही तयारी आहे. मुंबईपासून पुणे आणि नाशिकपर्यंत मराठी नेत्यांना महापौरपदावर बसवून मराठी समाजासोबत राजकीय समतोल राखण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे. मुंबईत महापौर पद ओपन कॅटेगरीत महिलांसाठी राखीव असल्याने इच्छुक उमेदवारांनी राज्यस्तरीय नेत्यांशी संपर्क साधण्यास सुरुवात केली आहे.

महाराष्ट्र भाजप अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सांगितले की, महापौर पदाबाबतचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस २४ जानेवारीला दावोसहून परतल्यानंतर घेतला जाईल. बीएमसी निवडणुकीत २२७ जागांपैकी १२३ महिला नगरसेविका निवडून आल्या आहेत. भाजपच्या ८९ नगरसेवकांपैकी ४९ महिला आहेत, तर शिंदे गटाच्या २९ नगरसेवकांपैकी १९ महिला निवडून आल्या आहेत. भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेनेच्या मिळून एकूण ६८ महिला नगरसेविका आहेत, त्यापैकी एक महापौर निवडली जाणार आहे. भाजपने स्पष्ट केले आहे की मुंबईचा महापौर मराठी असेल आणि आरक्षणानंतर महिला मराठी चेहऱ्याचा शोध पक्षाला घ्यावा लागणार आहे.

अशा स्थितीत बीएमसीचा महापौर कोण होणार, याबाबत सध्या सस्पेन्स कायम आहे. त्यामुळे भाजप आपल्या कोणत्या महिला नगरसेविकेला महापौरपद देणार, हा प्रश्न उपस्थित होत आहे. मुंबईत महापौरपदासाठी अनेक महिला नगरसेविका शर्यतीत आघाडीवर आहेत. यामध्ये राजश्री शिरवाडकर, शीतल गंभीर, आशा मराठे, हर्षिता नार्वेकर, रितू तावडे, अलका केरकर, तेजस्वी घोसाळकर, राणी द्विवेदी, सीमा शिंदे, जिज्ञासा शाह, श्वेता कोरगावकर आणि शिल्पा सांगुरे यांचा समावेश आहे. भाजपच्या विजयी महिला नगरसेविकांमध्ये महापौरपदासाठी प्रमुख दावेदार म्हणून तेजस्वी घोसाळकर यांचे नाव पुढे येत आहे. त्या दिवंगत शिवसेना (यूबीटी) नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांच्या पत्नी आहेत. भाजप सूत्रांच्या माहितीनुसार, महिला महापौर निवडताना व्यक्तीची प्रतिमा आणि संघटनेप्रती निष्ठा हे सर्वात महत्त्वाचे निकष असतील. तसेच मेहनत करण्याची क्षमता आणि वर्षभर जनतेशी संपर्क ठेवण्याची ताकदही पाहिली जाईल. आता भाजप मुंबईच्या विकासाची जबाबदारी कोणाकडे सोपवते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# मिडल ईस्टमध्ये महायुद्धाची चाहूल



अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढता तणाव पुन्हा एकदा धोकादायक वळणावर पोहोचला आहे. इराणने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना कठोर इशारा देत सांगितले आहे की तेहरानवर कोणत्याही प्रकारचा हल्ला झाला, तर तो "ऑल-आऊट वॉर" मानला जाईल आणि त्याला अत्यंत कडक पद्धतीने प्रत्युत्तर दिले जाईल.

दरम्यान, इस्लामिक रेव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स (IRGC) च्या एका कमांडरने आपली बोट ट्रिगरवर असल्याचेही म्हटले आहे. एका वरिष्ठ इराणी अधिकाऱ्याने रॉयटर्सशी बोलताना सांगितले की अमेरिकेकडून मर्यादित, सर्जिकल किंवा कोणतीही लष्करी कारवाई झाली, तरी इराण ती ऑल-आऊट वॉर म्हणूनच पाहील. अधिकाऱ्याने स्पष्ट केले, "या वेळी हल्ला झाला, तर आमच्याकडे असलेली प्रत्येक साधनसामग्री वापरून आम्ही सर्वात कठोर पद्धतीने प्रत्युत्तर देऊ." हा इशारा अशा वेळी देण्यात आला आहे, जेव्हा राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी अमेरिकन युद्धनौकांचा मोठा ताफा इराणच्या दिशेने रवाना झाल्याचा दावा केला आहे.

न्यूयॉर्क टाइम्सच्या वृत्तानुसार, अमेरिकेचे एअरक्राफ्ट कॅरिअर अब्राहम लिंकन आणि टॉमहॉक क्षेपणास्त्रांनी सज्ज तीन विध्वंसक जहाजे मध्य पूर्वेत पाठवण्यात आली आहेत. याशिवाय अमेरिकन हवाई दलाने डझनभर F-15E फायटर जेट्सही तैनात केले आहेत. इराणी अधिकाऱ्यांनी सांगितले की देश हाय अलर्टवर असून लष्कर कोणत्याही "वर्स्ट-केस सीनारियो"साठी सज्ज आहे. सातत्याने अमेरिकन लष्करी दबावाखाली असलेल्या देशासाठी स्वतःच्या संरक्षणासाठी सर्व पर्याय तयार ठेवणे ही गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. उल्लेखनीय म्हणजे, नववर्षाच्या सुरुवातीपासूनच इराणमध्ये सरकारविरोधी आंदोलनांची मालिका सुरू आहे.

मानवाधिकार संघटनांच्या मते, या आंदोलनांदरम्यान आणि सुरक्षा दलांच्या कारवाईत आतापर्यंत ५,००० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. ट्रम्प यांनी यापूर्वी इराणच्या कारवायांवरून लष्करी हस्तक्षेपाची धमकी दिली होती, मात्र गेल्या आठवड्यात त्यांनी नरमाईची चिन्हे दाखवली होती आणि तणाव कमी होत असल्याचे चित्र होते. मात्र दावोस दौऱ्यावरून परतल्यानंतर ट्रम्प यांच्या नव्या वक्तव्यांमुळे आणि अमेरिकन लष्करी तैनातीमुळे परिस्थिती पुन्हा चिघळली आहे. दरम्यान, इराणच्या सशस्त्र दलांच्या प्रवक्त्यांनीही इशारा दिला आहे की सर्वोच्च नेत्यावर कोणतीही कारवाई झाल्यास "संपूर्ण जगाला आगीत झोकले जाईल."

**इस्रायलसाठी उड्डाणे रद्द : एअर फ्रान्स आणि KLMचा निर्णय**



मध्य पूर्वेत इराणविषयक वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर युरोपमधील प्रमुख विमान कंपन्यांनी खबरदारीचे पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. फ्रान्सची एअर फ्रान्स आणि नेदरलँड्सची KLM या विमान कंपन्यांनी इस्रायल, दुबई आणि सौदी अरेबियासाठीची उड्डाणे किमान रविवारीपर्यंत रद्द केली आहेत. या निर्णयामागे "सुरक्षा तणाव" असल्याचे दोन्ही कंपन्यांनी स्पष्ट केले आहे. एअर फ्रान्स आणि KLM या एकाच होल्डिंग कंपनी—एअर फ्रान्स-KLM—अंतर्गत कार्यरत आहेत. प्रवासी आणि क्रू यांची सुरक्षा ही सर्वोच्च प्राथमिकता असून परिस्थितीवर सातत्याने नजर ठेवली जात असल्याचे कंपन्यांनी सांगितले.

हा निर्णय अशा वेळी घेण्यात आला आहे, जेव्हा जर्मनीच्या लुफ्थांसा ग्रुपने आधीच इस्रायलसाठीच्या नाईट फ्लाइट्स जानेवारीअखेरपर्यंत रद्द केल्या आहेत. लुफ्थांसा ग्रुपमध्ये लुफ्थांसा, स्विस, ऑस्ट्रियन एअरलाइन्स, ब्रुसेल्स एअरलाइन्स आणि युरोविंग्स यांसारख्या मोठ्या विमान कंपन्यांचा समावेश आहे. यापूर्वीही क्षेत्रातील तणाव वाढल्यावर अनेक आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांनी उड्डाणे मर्यादित केली होती.

अमेरिकेने मध्य पूर्वेत आपली लष्करी उपस्थिती अधिक मजबूत केल्याच्या पार्श्वभूमीवर विमान कंपन्यांचा हा निर्णय आला आहे. इराणमधील अलीकडील सरकारविरोधी आंदोलनांच्या दडपशाहीवर अमेरिका कठोर भूमिका घेत असून संभाव्य लष्करी कारवाईचे संकेत दिले आहेत, त्यामुळे या भागात नव्या संघर्षाची भीती वाढली आहे. मात्र, आतापर्यंत ना युरोपीय विमान प्राधिकरणांकडून, ना इस्रायली एव्हिएशन अथॉरिटीकडून कोणतीही विशेष सुरक्षा सूचना जारी करण्यात आलेली नाही. इस्रायल डिफेन्स फोर्सेस (IDF) नेही शुक्रवारी स्पष्ट केले की सामान्य नागरिकांसाठीच्या सुरक्षा मार्गदर्शक सूचनांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. सध्या विमान कंपन्या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत आणि पुढील काही दिवसांत सुरक्षा स्थितीच्या आधारे पुढील निर्णय घेतले जातील.

# महाराष्ट्रासाठी 30 लाख कोटींच्या गुंतवणुकीचे करार

## तिसरी मुंबईत टाटाची ११ बिलियन डॉलरची गुंतवणूक येणार

**मुंबई, प्रतिनिधी**

जागतिक आर्थिक परिषदेची दावोसमधील वार्षिक बैठक यंदा महाराष्ट्रासाठी अतिशय लाभदायक आहे. त्यामुळे महाराष्ट्रासाठी ३० लाख कोटींच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त ७ ते १० लाख कोटींच्या गुंतवणुकीबाबत प्राथमिक बोलणी झाली असून हे करारही येत्या एक-दोन महिन्यात प्रत्यक्षात उतरणार आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी दिली. मुंबईला येत्या काळात आपण सर्क्युलर इकॉनॉमीचे शहर करणार असून त्यामुळे मुंबईतील घनकचरा आणि सांडपाण्याचे रूपांतर संपत्तीत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्याचे शिष्टमंडळ दावोस दौऱ्यात सहभागी झाले आहे. १७ जानेवारीपासून सुरु असलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत आर्थिक गुंतवणुकीबाबत राज्य सरकारने विविध आंतराराष्ट्रीय उद्योग समूहांशी सामंजस्य करार केले. या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी आज दावोस येथून झूमच्या माध्यमातून मुंबईतील पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी उद्योग, सेवा, शेती अशा सर्वच क्षेत्रात गुंतवणूक होणार आहे. यातील ८३ टक्के करारांमध्ये थेट परकीय गुंतवणूक असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली.

कोकणात १६ टक्के, मुंबई महानगरात २२ टक्के तर विदर्भात १३ टक्के गुंतवणूक आली आहे. ५० टक्के गुंतवणूक राज्याच्या इतर भागात आली आहे. उत्तर महाराष्ट्रात नाशिक, अहिल्यानगर, नंदूरबार,धुळे या भागात ५० हजार कोटींची गुंतवणूक होईल. मराठवाडयाचे मॅग्नेट छत्रपती संभाजीनगर असून तिथे ५५ हजार कोटींची गुंतवणूक आली आहे . नागपूर विभाग तसेच विदर्भात २ लाख ७० हजार कोटी गुंतवणूक आली आहे. कोकणात ३ लाख ५० हजार कोटी गुंतवणूक येणार आहे. रायगड हे नवीन मॅग्नेट तर आहेच पण रत्नागिरी, सिंधुदुर्गमध्येही चांगली गुंतवणूक होणार आहे, असे फडणवीस म्हणाले.

आपण नवीन तिसरी मुंबई तयार करतो आहोत. त्यात रायगड पेण ग्रोथ सेंटर घोषित केले आहे. यात सार्वजनिक-खासगी भागीदारी आहे. जसा बीकेसी तयार केला तसा बिझनेस डिस्ट्रिक्ट म्हणून रायगड पेण स्मार्ट सिटी असेल. नवी मुंबई विमानतळापासून याला कनेक्टिव्हिटी असेल. अर्थव्यवस्था जर दुप्पट वेगाने मोठी करायची असेल तर इनोव्हेशन इकोसिस्टिम उभी करावी लागते. इनोव्हेशन सिटी त्यासाठी उभारावी लागेल. तिसरी मुंबई हे त्याचे उत्तर आहे. टाटा सन्स तिथे ११ बिलियन डॉलरची गुंतवणूक करणार आहे. भविष्यातले शहर म्हणून हे शहर ओळखले जाईल, असा विश्वास फडणवीस म्हणाले.

**मुंबईमध्ये सर्क्युलर इकॉनॉमी**

मुंबईमध्ये येत्या काळात सर्क्युलर इकॉनॉमी उभारणार आहोत. मुंबईतील पाणी, हवेची शुद्धता वाढली पाहिजे. त्यासाठी वेस्ट हे वेल्थमध्ये रूपांतरित झाले पाहिजे. मुंबई महापालिका त्यासाठी पुढाकार घेऊन तर काम करेलच, पण त्यात खासगी क्षेत्रातूनही गुंतवणूक येईल. हाच प्रयोग पुणे,नागपूरसारख्या शहरातही राबविण्यात येईल. यामुळे मुंबईसह इतर शहरांचा चेहरामोहराच बदलून जाईल, असा दावा फडणवीस यांनी केला.

**यश पाहवत नसलेल्यांचे पेड टूलकिट**

इथल्याच कंपन्यांसोबत दावोसमध्ये जाऊन करार केले, अशी टीका विरोधकांकडून होत आहे. त्याबाबत विचारले असता फडणवीस म्हणाले, ज्यांना महाराष्ट्राचे यश पाहवत नाही ते अशा टूलकिटच्या माध्यमातून टीका करत आहेत. समाज माध्यमात तर पेड टीका करण्यात येत आहे. पैसे देऊन अशा प्रकारे टीका करणाऱ्यांची मी नोंद घेतली आहे. मंत्री मंगलप्रभात लोढांच्या मुलासोबत दावोसमध्ये का करार केला? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. अभिषेक लोढा हे देशातील प्रथितयश उद्योगपती आहेत. त्यांनी केलेल्या करारांमुळे महाराष्ट्राला फायदा होणार आहे. जगातील चार मोठ्या कंपन्या डेटासेंटरमध्ये गुंतवणूक करत आहेत. डेटासेंटर गुंतवणुकीत मुंबई त्यामुळे पहिल्या क्रमांकावर येईल. यात ८० टक्के परदेशी गुंतवणूक आहे. २०२१ मध्ये आलेल्यांनी ७० ते ८० हजार कोटींचे करार केले होते. आता ३० लाख कोटींचे करार झाले आहेत, असा टोलाही फडणवीस यांनी लगावला.

**मुंबईत आल्यानंतर तिथले करार**

सध्या मी महाराष्ट्राच्या औद्योगिक गुंतवणुकीच्या करारात व्यस्त आहे. मुंबईत आल्यानंतर तिथले करार पाहणार आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. त्यामुळे फडणवीस दावोस दौऱ्यावरून मुंबईत परतल्यानंतर महापौर निवडणुकीच्या निवडीला वेग येणार आहे.

## पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीत ३ दिवसीय "व्याख्यानमाला"

**मुंबई, प्रतिनिधी**

सार्वजनिक उत्सव, व्याख्यानमाला आणि सांस्कृतिक उपक्रम हे समाज, संस्कृती, राष्ट्र आणि एकता यांना एकत्र आणणारे प्रभावी माध्यम आहे. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या दीर्घ परंपरेप्रमाणेच बौद्धिक समृद्धी देणाऱ्या व्याख्यानमालांची परंपरा शासनाने पुढे नेण्याचा निर्णय घेतला असून, त्यातील हा पहिला उपक्रम आहे, असे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार म्हणाले.

सांस्कृतिक कार्य विभागाच्या पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या वतीने प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेचा शुभारंभ सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या उपस्थितीत रवींद्र नाट्यमंदिर येथे झाला. या व्याख्यानमालेच्या उद्घाटनपर भाषणात ते बोलत होते. पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, ज्येष्ठ लेखक, विचारवंत आणि अभ्यासक अच्युत गोडबोले, सल्लागार समितीचे सदस्य, डॉ. शिरीष ठाकूर आणि सोनिया परचुरे यावेळी उपस्थित होते.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावावर भाष्य करताना सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.शेलार म्हणाले की, आज प्रत्येक नागरिकाचा तंत्रज्ञानाशी थेट संबंध आहे. मोबाईल, सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सद्वारे मोठ्या प्रमाणावर माहिती संकलित होत असून, या तंत्रज्ञानाचा योग्य, सुरक्षित आणि सकारात्मक वापर कसा करायचा हे समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. या विषयावर अच्युत गोडबोले यांच्यासारख्या अभ्यासू वक्त्यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गडकिल्ल्यांना जागतिक वारसा दर्जा मिळवून देण्याच्या प्रक्रियेचा उल्लेख करताना सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र शासनाच्या सक्रिय प्रयत्नांमुळे हा ऐतिहासिक निर्णय शक्य झाला. महाराजांची 'रयतेचा राजा' आणि 'उपभोगशून्य स्वामी' ही संकल्पना जागतिक स्तरावर मांडण्यात महाराष्ट्राला यश आले, याचा अभिमान असल्याचेही ते म्हणाले.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर साहित्य, लोककला, लोकसंगीत, विज्ञान, तंत्रज्ञान आणि विविध क्षेत्रांतील मराठी निर्मितीला चालना देण्यासाठी राज्यशासन कटिबद्ध असल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.शेलार यांनी सांगितले. राज्यात वर्षभरात १२०० हून अधिक सांस्कृतिक कार्यक्रम राबविले जात असून, ही महाराष्ट्राची सांस्कृतिक 'सॉफ्ट पॉवर' असल्याचेही त्यांनी नमूद केले.

पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक श्रीमती मीनल जोगळेकर म्हणाल्या की, गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानंतर संपूर्ण राज्यभर वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून व्याख्यानमाला हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या व्याख्यानमालेंतर्गत ज्येष्ठ लेखक, विश्लेषक व अभ्यासक अच्युत गोडबोले 'ए आय तंत्रज्ञान व कलाविश्व' या विषयावर संवाद साधला. २३ जानेवारी रोजी पुरातत्वशास्त्रज्ञ आणि पुरातत्व व वस्तूसंग्रहालय संचालनालयाचे संचालक डॉ. तेजस गर्गे ' छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांच्या युनेस्को नामांकनाचा रोमांचक प्रवास' आणि २४ जानेवारी रोजी मराठी भाषा विभाग व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी ' अभिजात मराठी : इतिहास वर्तमान व भविष्य ' या विषयांवर संवाद साधणार आहेत.

## त्रिभाषा धोरण निश्चित करण्या संदर्भातील समितीस ४ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

**मुंबई, प्रतिनिधी**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासंदर्भात शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला, या समितीच्या कार्यकाळास दि. ५ जानेवारी पासून दि. ४ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीसाठी (एक महिना) मुदतवाढ देण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

या समितीस दि. १५ डिसेंबर २०२५ च्या शासन निर्णयान्वये दि. ५ डिसेंबर, २०२५ ते ४ जानेवारी, २०२६ या कालावधीकरिता एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि समितीचे कामकाजाप्रित्यर्थ समितीच्या संकेतस्थळावर विविध जनसामान्यांमार्फत प्राप्त प्रश्नावली व मतावलीद्वारे प्राप्त प्रतिसाद यावर विचारविमर्श व पुढील विश्लेषण करण्याच्या कार्यवाहीसाठी आता ४ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष, शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव, यांनी दि. २ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये सद्यस्थितीतील सुरू असलेल्या इतर कामकाजाच्या अनुषंगाने समितीच्या कार्यकाळास मुदतवाढ मिळणे आवश्यक असल्याचे नमूद केले होते. तसेच समितीस एक महिन्याची मुदतवाढ देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळविले होते. त्यास अनुसरून त्रिभाषा धोरण समितीच्या कार्यकाळास एक महिना मुदतवाढ देण्यात येत असल्याचे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळांमध्ये देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत

**मुंबई, प्रतिनिधी**

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त येत्या २६ जानेवारी रोजी राज्यातील सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये एकाचवेळी 'देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. 'राष्ट्र प्रथम' या संकल्पनेवर आधारित असणाऱ्या या कवायती शासकीय ध्वजवंदन कार्यक्रमानंतर होणार असून यामध्ये राज्यातील एक लाखांहून अधिक शाळांमधून, सात लाखापेक्षा जास्त शिक्षकांच्या उपस्थितीत सुमारे दोन कोटींपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी होणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली. विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, स्वयंशिस्त, आरोग्य जागृती, शारीरिकदृष्ट्या कसरत/ व्यायाम करण्यासाठी प्रेरित करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे त्यांनी सांगितले.



याबाबत मंत्री भुसे यांनी मंत्रालयात माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यावेळी उपस्थित होते.

मंत्री भुसे म्हणाले, या कवायतींचा कालावधी साधारतः १५ ते २० मिनिटांचा असेल. यासाठी सर्व शाळांना नमुना मार्गदर्शक व्हिडीओ पुरविण्यात आलेला असून सध्या प्रत्येक शनिवारी विद्यार्थ्यांचा सामूहिक स्वरुपात कवायत संचलन सराव करून घेण्यात येत आहे. प्रजासत्ताक दिनी सामूहिक कवायत संचलन असल्यामुळे गावातील, शहरातील मैदानाच्या क्षमतेनुसार विद्यार्थी शाळेत अथवा एका मैदानावर एकत्र करून कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. कार्यक्रमास परिसरातील लोकप्रतिनिधी, अधिकारी, ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी, पालक व समाजसेवी गणमान्य प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या सरावासाठी प्रत्येक १० विद्यार्थ्यामागे एक शिक्षक मार्गदर्शनासाठी नेमण्यात आलेला आहे.

मंत्री भुसे म्हणाले, हा कार्यक्रम देशभक्तीमय वातावरणात होणार असून शालेय शिक्षण आयुक्त हे या कार्यक्रमाचे सर्व व्यवस्थापन पाहत आहे. आजारी, अशक्त, दिव्यांग अशा विद्यार्थ्यांना कवायत करण्याची सक्ती नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी आदींनी या कार्यक्रमासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

## महाराष्ट्रात गुटखाबंदीसाठी स्वतंत्र कायदा आणणार -झिरवाळ

**मुंबई, प्रतिनिधी**

महाराष्ट्रात गुटखा व तत्सम प्रतिबंधित पदार्थांवर पूर्ण बंदी घालण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात येणार आहे. गुजरातमध्ये लागू असलेल्या दारूबंदी कायद्याच्या धर्तीवर यासंदर्भात अभ्यासाअंती आवश्यक प्रस्ताव सादर करून कायद्याचा मसुदा तयार करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले.



गुटखा व प्रतिबंधित अन्नपदार्थांवरील कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन मंत्री झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आढावा बैठक झाली. या बैठकीस वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाचे प्रधान सचिव धीरज कुमार, अन्न व औषध प्रशासन आयुक्त श्रीधर दुबे पाटील, विधि व न्याय विभागाचे सहसचिव महेंद्र जाधव, गृह विभागाचे सहसचिव राहुल कुलकर्णी, अतिरिक्त पोलीस महासंचालक सागर पाटील यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यात गुटखा व प्रतिबंधित अन्नपदार्थांची अवैध विक्री रोखण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात अन्न व औषध प्रशासन व गृह विभागाच्या संयुक्त पथकाची स्थापना करण्याचे तसेच अवैध गुटखा विक्री करणाऱ्यांविरोधात 'मकोका' अंतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव मांडल्याचे सांगितले. त्याच पार्श्वभूमीवर गुजरातच्या दारूबंदी कायद्याच्या धर्तीवर गुटखाबंदीसाठी स्वतंत्र कायदा तयार करून तो येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडण्याचे निर्देश मंत्री झिरवाळ यांनी दिले.

अन्न व औषध प्रशासन मंत्री झिरवाळ म्हणाले की, राज्यात गुटखा व तत्सम प्रतिबंधित पदार्थांच्या उत्पादन, वितरण व विक्रीवर बंदी आहे. अवैध व्यवहारावर अधिक कठोर कायदेशीर कारवाईसाठी गुटखा विक्रेत्यांवर मकोका लागू करण्याबाबत कायद्यात आवश्यक दुरुस्त्या करून गुटखा व्यवसायाशी संबंधित गुन्ह्यांनाही 'मकोका'च्या कक्षेत आणण्यासाठी कायदा अधिक कठोर केला जाणार आहे.

गुटखा विक्री व वाहतुकीविरोधात राज्यभर मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली असून विविध जिल्ह्यांत अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यासोबतच व्यापक जनजागृती मोहीमही राबविण्यात येत आहे.

गुटखा व तत्सम प्रतिबंधित पदार्थांवर मकोका लागू करण्यासाठी कायद्यात आवश्यक तरतुदी सुचविण्याच्या दृष्टीने अन्न व औषध प्रशासन विभागाने गृह विभाग व विधि व न्याय विभागाशी समन्वय साधून कार्यवाही करावी, असे निर्देश अन्न व औषध प्रशासन मंत्री झिरवाळ यांनी दिले.

विशेषतः शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात अशा प्रतिबंधित पदार्थांची विक्री होत असल्यास त्यावर तातडीने आणि कठोर कारवाईचे निर्देश देण्यात आले असल्याचेही अन्न व औषध प्रशासन मंत्री झरवाळ यांनी सांगितले.

## उत्तन घनकचरा प्रकल्पात बायोमायनिंग प्रक्रियेची आयुक्तांकडून पाहणी

**भाईंदर, प्रतिनिधी**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त राधाबिनोद अ. शर्मा यांनी उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्पास भेट देऊन तेथे सुरू असलेल्या बायोमायनिंग प्रक्रियेची सविस्तर पाहणी केली. या भेटीदरम्यान प्रकल्पातील कामकाजाची सद्यस्थिती, तांत्रिक बाबी, मनुष्यबळाची उपलब्धता तसेच पर्यावरणीय निकषांच्या अनुषंगाने सुरू असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. यावेळी, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता नितीन मुकणे, उप अभियंता, कनिष्ठ अभियंता, घनकचरा प्रकल्प कर्मचारी आणि कंत्राटदार उपस्थित होते.

बायोमायनिंग प्रक्रियेमार्फत साचलेल्या अंदाजे 9 लाख मेट्रिक टन जुना कचऱ्याचे शास्त्रीय पद्धतीने वर्गीकरण करून पुनर्वापरयोग्य साहित्य वेगळे करणे, तसेच कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे होणारे पर्यावरणीय प्रदूषण कमी करणे, या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी मा. आयुक्तांनी केली. प्रकल्पामुळे परिसरातील स्वच्छता, आरोग्य व पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने होणाऱ्या सकारात्मक परिणामांवर यावेळी भर देण्यात आला. पाहणीदरम्यान मा. आयुक्तांनी संबंधित अधिकारी व



ठेकेदारांशी चर्चा करून प्रकल्पातील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. सद्यस्थितीमध्ये दहा हजार मेट्रिक टन जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया झालेली असून बायोमायनिंग प्रक्रियेला गती देऊन निश्चित कालमर्यादित कामे पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच कामकाजात गुणवत्ता, सुरक्षितता आणि पर्यावरणीय नियमांचे काटेकोर पालन होईल याची दक्षता घेण्याचे आदेशही यावेळी देण्यात आले. उत्तन येथील घनकचरा प्रकल्पातील बायोमायनिंग कामे नियोजित कालावधीत पूर्ण होणे अत्यंत आवश्यक असून, यामुळे शहरातील साचलेल्या कचऱ्याचा प्रश्न प्रभावीपणे मार्गी लागणार आहे.

## प्रदूषणाचे नियम धाब्यावर बसवल्याने १०६ बांधकामांना 'स्टॉप वर्क नोटीस'

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबईतील प्रदूषण नियंत्रणासाठी मुंबई महापालिकेने कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. नियमभंग करणाऱ्या १०६ बांधकामांना 'कार्य स्थगिती' नोटीस पाठवण्यात आल्या असल्याची माहिती मुंबई महापालिकेमार्फत देण्यात आली.

मुंबईतील वायूप्रदूषण नियंत्रणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाद्वारे सातत्याने विविधस्तरीय कार्यवाही करण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी व अतिरिक्त महापालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ.अविनाश ढाकणे यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात येत असलेल्या उपाययोजना व कार्यवाहींचा भाग म्हणून मुंबई महापालिका क्षेत्रात सुरु असलेल्या सर्व बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी 'एअर क्वालिटी सेन्सर्स' अर्थात 'वायू गुणवत्ता मापन प्रणाली' कार्यान्वित करणे, यापूर्वीच बंधनकारक करण्यात आले आहे. तर, १ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या मोठ्या प्रकल्पांमध्ये 'रेफरन्स ग्रेड एअर क्वालिटी मॉनिटर' बसविण्याचे आदेशदेखील यापूर्वीच देण्यात आले आहेत. मात्र, काही बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी संबंधित आदेशांनुसार अत्यावश्यक असणारी 'वायू गुणवत्ता मापन प्रणाली' बसविण्यात आली नसल्याचे आढळून येत आहे. अशा सर्व प्रकल्पांना काम बंद करण्याच्या नोटीस तातडीने देण्याचे निर्देश सर्व संबंधित अधिका-यांना देण्यात आले होते. यानुसार गुरुवारी सायंकाळ पर्यंत १०६ बांधकामांना 'कार्य स्थगिती' नोटीस देण्यात आल्या आहेत. यामध्ये खासगी बांधकामांसह रेल्वे पूल बांधकाम, एस आर ए प्रकल्प, म्हाडा प्रकल्प इत्यादी बांधकाम प्रकल्पांचाही समावेश आहे. या अनुषंगाने नियमित पाहणी सुरु असून नियमभंग करणाऱ्या उर्वरित बांधकामांना नोटीस देण्याची प्रक्रिया देखील सुरू आहे.

याबाबत मुंबई महापालिकेच्या 'पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाद्वारे दिलेल्या माहितीनुसार, ज्या बांधकाम प्रकल्पांवर अद्याप 'वायू गुणवत्ता मापन प्रणाली' कार्यान्वित नाही, अशा ठिकाणी तात्काळ नोटीस बजावून अनुपालन अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ही यंत्रणा बसविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन मे २०२५ पासून सातत्याने पाठपुरावा करीत आहे. मात्र, वारंवार पाठपुरावा करुन देखील प्रतिसाद न देणा-या प्रकरणी त्वरित काम बंद करण्याच्या नोटीस देण्यात येत आहेत.

दरम्यान, वायूप्रदूषण प्रकरणी पुढील न्यायालयीन सुनावणी शुक्रवार, दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. पूर्वनियोजित कृती आराखड्यानुसार प्रत्यक्ष स्थळभेटी व पाहणी सुरू ठेवण्याचे आदेश महानगरपालिका प्रशासनाने सर्व विभागस्तरीय पथकांना दिले आहेत. या अंतर्गत प्रत्यक्ष तपासणी, नोंदवही निरीक्षण आणि तात्काळ कारवाईवर भर देण्यात येत आहे. ही कारवाई केवळ बांधकाम क्षेत्रापुरतीच मर्यादित नसून नियमांचे पालन न करणाऱ्या बेकरी युनिट्सवरही 'कार्य स्थगिती' नोटीस देण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य विभाग यांना देण्यात आले आहेत. धूर, इंधन वापर आणि उत्सर्जन मानकांचे उल्लंघन करणाऱ्या प्रकरणी कडक कारवाई करण्यात येणार आहे.

मुंबईतील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नसून नियम पाळणाऱ्यांना सहकार्य, तर नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार महानगरपालिका प्रशासनाद्वारे करण्यात येत आहे. महानगरपालिका प्रशासनाद्वारे राबविण्यात येत असलेल्या विविधस्तरीय उपाययोजनांमुळे मुंबईतील हवेच्या गुणवत्तेत सातत्याने सुधारणा होत असून, बहुतेक ठिकाणी हवेची गुणवत्ता 'समाधानकारक' वा 'मध्यम' श्रेणीत आहे. वायूप्रदूषण नियंत्रणासाठी महानगरपालिकेची ही कारवाई नियमितपणे व अधिकाधिक प्रभावीपणे सुरू राहणार असल्याचेही उप आयुक्त (पर्यावरण व वातावरणीय बदल) अविनाश काटे यांनी कळविले आहे. त्याचबरोबर गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळपर्यंत 'वायु गुणवत्ता मापन प्रणाली न बसविणाऱ्या १०६ बांधकामांना तातडीने काम बंद करण्याची नोटीस देण्यात आल्याची माहिती देखील श्री काटे यांनी दिली असून या बांधकामांमध्ये शीव परिसरातील रेल्वे पूल बांधकामासह एच पूर्व विभागातील म्हाडा प्रकल्प व 'के पूर्व' विभागातील 'एस आर ए' प्रकल्पांच्या बांधकामांचाही समावेश आहे, असेही त्यांनी कळविले आहे.

### महत्त्वाच्या बातम्या

## वाहतूक पोलिसांनी केले रक्तदान

**मुंबई, प्रतिनिधी**

समाजातील गरजू रुग्णांसाठी जीवनदायी ठरणाऱ्या रक्तदानासारख्या पवित्र कार्यातून भोईवाडा वाहतूक विभागाने मानवतेचा आदर्श उभा केला आहे. रस्त्यावरील शिस्त राखणाऱ्या वाहतूक पोलिसांनी रक्तदानासारख्या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी दाखवून दिली. लालबाग परळ उड्डाणपुलाखाली भोईवाडा वाहतूक विभागाच्या कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे आयोजन प्रभारी भोईवाडा वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक सरदार नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी बृहन्मुंबई वृत्तपत्र विक्रेता संघाचे विश्वस्त जीवन भोसले यांच्यासह आरोग्यदूत संतोष महापुरे यांची विशेष उपस्थिती लाभली. शिबिरात पीएसआय जगताप, कॉन्स्टेबल चव्हाण, प्रवीण महाले, अभिजीत खंडागळे, रमेश घोरपडे, मंगेश कांबळे, भाऊसाहेब राजोळे, प्रणाली तांबे यांच्यासह केईएम रुग्णालयाच्या वैद्यकीय पथकाचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच कविता ससाने यांच्या योगदानामुळे हा उपक्रम अधिक यशस्वी ठरला.

## आधुनिकीकरणासाठी एसटीला १६४ कोटी

**मुंबई, प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांचे आधुनिकीकरण आणि सध्या बसेसची खरेदी करण्यासाठी राज्य सरकारने महामंडळाला निधी दिला आहे. या कामांसाठी राज्य सरकारच्या गृह विभागाने १६४.२८ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला. सध्या वाहनांची खरेदी देयके व बसस्थानकांचे अधिनिकीकरण यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात आली होती. हा निधी वितरित करण्याची विनंती एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी सरकारकडे विनंती केली होती.

## भांडुप-मुलुंड परिसरात २४ तास पाणीपुरवठा बंद

**मुंबई, प्रतिनिधी**

मुलुंडमध्ये वैतरणा मुख्य जलवाहिनीवरील १२ जलजोडण्या मुख्य जलवाहिनीवर स्थलांतरित करण्यासाठी तसेच भांडुपमधील खिंडीपाडातील जलवाहिनीला लोखंडी झाकण बसवण्यासाठी मंगळवार, २७जानेवारीला सकाळी १० ते बुधवार, २८ जानेवारीला सकाळी १० वाजेपर्यंत करण्यात येणार आहे. या कामामुळे मुलुंड व भांडुपसह ठाण्यातील काही भागात पाणीपुरवठा बंद राहणार आहे. मुलुंड अमरनगर, गरखाचाळ, जय शास्त्री नगर, पंचशील नगर, हनुमानपाडा, राहुल नगर, मुलुंड वसाहत, मलबार हिल मार्ग, स्वप्ननगरी, वीणा नगर, योगी हिल, मॉडेल टाऊन मार्ग, बी. आर. मार्ग, वैशालीनगर, घाटीपाडा व गुरुगोविंद सिंग मार्ग लगतचा परिसर, मुलुंड-गोरेगाव जोडरस्ता लाल बहादूर शास्त्री मार्ग, जे. एन. मार्ग, देवीदयाल मार्ग, क्षेपणभूमी मार्ग, गोशाळा मार्ग, नाहुरगाव. भांडुप खिंडीपाडा अ) लोअर खिंडीपाडा, ब) अप्पर खिंडीपाडा. ठाणे: किसननगर (पूर्व), किसननगर (पश्चिम), भटवाडी.

## कल्याणकारी मंडळाच्या पाल्य शिष्यवृत्ती निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात जाणार

**मुंबई, प्रतिनिधी**

ज्या नोंदणीकृत बांधकाम कामगारांचे पाल्य मागासवर्गीय योजनेमधून अथवा इतर योजनेमधून शिष्यवृत्ती घेत असतील त्यांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाकडून आर्थिक सहाय्य दिले जाणार नाही, असा निर्णय जाहीर केला आहे. तसे याबाबतचे पत्र मंडळाने काढले आहे. या पत्राविरोधात महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समिती उच्च न्यायालयात जाणार असून पुढील भुमिका ठरविण्यासाठी बांधकाम कामगारांचा ३० जानेवारीला मेळावा घेणार आहे, अशी माहिती संयुक्त कृती समिती निमंत्रक शंकर पुजारी यांनी दिली. १ जानेवारी २०२६ ला कामगार कल्याणकारी मंडळाने बांधकाम कामगारांच्या पाल्याच्या शिष्यवृत्तीसंदर्भात निर्णय घोषित केला आहे. त्यानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शासकीय योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती घेतलेले असल्यास बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत त्यांना आर्थिक साहित्य मिळणार नाहीत. उलट; त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळास शपथपत्र लिहून दिले पाहिजे की, ते बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची आर्थिक सहाय्य घेतल्यानंतर इतर कोणतीही शिष्यवृत्ती घेणार नाहीत, असे प्रशासनाला अधिकृत कळवावे. त्याशिवाय त्यांचा आर्थिक सहाय्याचा अर्ज मंजूर केला जाणार नाही, अशी माहिती शंकर पुजारी यांनी दिली.

## दादर अग्निशमन केंद्रात माघी गणेशोत्सव साजरा

**मुंबई, प्रतिनिधी**

दादर अग्निशमन केंद्रातर्फे माघी गणेशोत्सव मोठ्या भक्तिभावात व उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त अग्निशमन केंद्राच्या आवारात श्री गणेशाची आकर्षक सजावट करण्यात आली होती. सकाळी विधीवत पूजा-अर्चा, आरती व नैवेद्य अर्पण करून उत्सवाला सुरुवात झाली. या कार्यक्रमाला अग्निशमन दलातील अधिकारी व जवान मोठ्या संख्येने उपस्थित होते. सेवा बजावत असताना परंपरा आणि संस्कृती जपण्याचा संदेश या उत्सवातून देण्यात आला. गणेशोत्सवानिमित्त सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जवानांना संबोधित करत आ-पत्तीच्या काळात नागरिकांच्या सुरक्षेसाठी अग्निशमन दलाने बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा उल्लेख केला.

## एपीके फाईल पाठवून फसवणूक करणाऱ्यास अटक

**मुंबई, प्रतिनिधी**

एपीके फाईल पाठवून तरुणाची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी नुमान नौशाद शेख यास गोरेगाव पोलिसांनी अटक केली. त्याच्यासह त्याच्या इतर सहकाऱ्यांवर मोबाईल हॅक करुन बँक खात्यावर डल्ला मारल्याचे उघडकीस आले आहे. २५ वर्षांचा तक्रारदार तरुण गोरेगाव येथे राहत असून मालाडच्या एका खासगी कंपनीत कामाला आहे. गेल्यावर्षी सप्टेंबरमध्ये त्याला अज्ञाताने एक एपीके फाईल पाठविली होती. ही फाईल ओपन करताच त्याचा मोबाईल हॅक झाला. दुसऱ्या दिवशी त्याचा मोबाईल पुन्हा सुरु झाला. यावेळी त्याला बँकेतून काही मेसेज आल्याचे दिसून आले. अज्ञाताने एपीके फाईल पाठवून त्याचा मोबाईल हॅक करुन त्याच्या खात्यातून सुमारे दोन लाखांचा ऑनलाईन व्यवहार केला होता. हा प्रकार संशयास्पद वाटताच त्याने बँकेच्या कस्टमर केअरला कॉल करुन ही माहिती दिली. त्यानंतर त्याने गोरेगाव पोलिसांत तक्रार केली. या तक्रारीनंतर पोलिसांनी अज्ञाताविरोधात फसवणुकीसह आयटी कलमांतर्गत गुन्हा दाखल केला.

## गुंतवणुकीवर परताव्याचे आमिष

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबईच्या बोरिवली परिसरात एक मोठा फसवणुकीचा गुन्हा उघडकीस आला आहे. दागिन्यांचा व्यापार आणि एमसीएक्समध्ये गुंतवणूक करण्याच्या नावाखाली एका व्यावसायिकाने आणि त्याच्या मित्रांनी एकूण ५.१० कोटी रुपयांची फसवणूक केली. कस्तुरबा पोलिसांनी या प्रकरणात चार जणांविरुद्ध फसवणुकीसह विविध कलमांखाली एफआयआर दाखल केला आहे. तक्रारदार विश्व मणी तिवारी (५२) यांची नितेश आणि त्याची पत्नी मुक्ता मेहता यांनी तिवारीला त्यांच्या 'मोनिका ज्वेलर्स' या दुकानात आणले आणि त्यांना एमसीएक्सवर सोने, चांदी आणि हिऱ्यांचा व्यापार करण्याचे आमिष दाखवले. त्यांनी ४० टक्क्यांपर्यंत परतफेड करण्याचे आश्वासन दिले होते.

## मुंबईत २०२६ सालातील पाचवे अवयवदान

**मुंबई, प्रतिनिधी**

२०२६ या वर्षातील मुंबईतील पाचवे मृतदेहातून अवयवदान २० जानेवारी मंगळवारी वाशी येथील फोर्टिस हिरानंदानी रुग्णालयात पार पडले. ६४ वर्षीय पुरुष रुग्णाच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबियांच्या संमतीने यकृत आणि दोन्ही मूत्रपिंडे दान करण्यात आली. या अवयवदानामुळे तीन गंभीर आजारी रुग्णांना नवे जीवन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर (झेडटीसीसी) मुंबईच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार या अवयवांचे वितरण करण्यात आले असल्याची माहिती प्रशासकीय अधिकारी व ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेटर संगीता देसाई यांनी दिली. मृतदेहातून अवयवदानामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचत असून, समाजात अवयवदानाबाबत जागरूकता वाढवण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

## जानकारी



# ये देसी टिप्स हटाएंगे, नवजात के शरीर से अनचाहे बाल

छोटे बच्चे की मांसपेशियों को मजबूती देने के लिए मसाज करना जरूरी होता है। तेल के एंटी-बैक्टीरियल गुण बच्चों को बीमारियों से बचाते हैं। इसके अलावा मालिश करने से बच्चे की त्वचा में नमी भी बरकरार रहती है। इसलिए जन्म से तीन महीने बाद ही मालिश के साथ शिशु को उबटन भी लगाना चाहिए। इस समय बच्चा की त्वचा थोड़ी ठीक हो जाती है और वह उबटन की मोटी परत आसानी से सहन करने योग्य हो जाता है।

### बेसन का उबटन

शिशु के जन्म के समय उसके शरीर पर कुछ बाल होते हैं, जो बड़े होने के साथ-साथ ज्यादा घने होने शुरू हो जाते हैं। इसके लिए बेसन, हल्दी, बादाम का तेल, थोड़ा-सा पानी मिलाकर उबटन तैयार कर लें। इसकी छोटी-सी लोई लेकर बच्चे के शरीर पर हल्के हाथों से रगड़ें। इससे त्वचा में निखार भी आता है।

### मलाई और बेसन का उबटन

बेसन में दूध की मलाई, चुटकी भर हल्दी और शहद मिलाकर उबटन तैयार कर लें। इसे बच्चे के शरीर पर लगाएं, बाद में गुनगुने पानी से बच्चे को पोंछ दें।

### गेहूं के आटे का उबटन

कुदरती तरीके से बच्चे के शरीर के बाल उतारने का यह सबसे अच्छा तरीका है। दो चम्मच गेहूं के आटे में चुटकी भर हल्दी और देसी घी के 7-8 बूंद मिलाकर इसे गूंथ लें। इस लोई से गोलाकृति में बच्चे के शरीर पर घुमाएं, बाद में गुनगुने पानी से बच्चे को स्पंज करें।



### बच्चे को उबटन लगाते समय बरतें ये सावधानियां

- बच्चे की मालिश हमेशा हल्के हाथों से करें।
- उबटन लगाने से पहले इस बात की जांच कर लें कि उसे कोई एलर्जी तो नहीं है।
- पूरे कपड़े उतारकर मसाज करने की बजाए पहले टांगों और बाद में शरीर के ऊपरी हिस्से की मसाज करें।
- सर्दी के मौसम में बच्चे की मसाज ध्यान से करें। इससे उसे ठंड लगने का डर रहता है।



खूबसूरत दिखने के लिए चेहरे की देखभाल के चक्कर में ज्यादातर लोग गर्दन को भूल जाते हैं। नतीजा, गर्दन और चेहरे की रंगत अलग-अलग। कैसे निखारें अपनी गर्दन की खूबसूरती, बता रहा है यह आलेख।

# ऐसे निखारें, अपनी गर्दन की खूबसूरती

अपने ब्यूटी रुटीन में आप क्या करती हैंड क्लींजिंग, स्क्रबिंग, टोनिंग आदि। अलमारी का एक खाना महंगे उत्पादों से भरा भी हो सकता है, लेकिन ये सब सिर्फ चेहरे के लिए अपनी त्वचा और खूबसूरती की देखभाल के लिए है, क्या सिर्फ इतना काफी है। घबराइए नहीं, यहां कुछ और खर्चे की बात नहीं हो रही। बात सिर्फ एक भूल या नजरअंदाजी की है, जो आपकी खूबसूरती पर बट्टा लगा सकती है। ये भूल है आपके ब्यूटी प्रोड्क्ट्स का चेहरे से नीचे न उतरना, यानी चेहरे पर फुल फोकस में गर्दन बेचारी मुंह ताकती ही रह जाती है। आपकी नजर इस पर तब जाती है, जब गर्दन आपकी खूबसूरती में फिट बैठने के लायक नहीं रह जाती। थोड़ी-सी देखभाल से आप गर्दन की खूबसूरती भी निखार सकती हैं।

### कम उम्र से ही ध्यान देने की जरूरत

शरीर के अन्य भागों से गर्दन कुछ अलग होती है, वो इसलिए, क्योंकि इसके सेल्स शरीर के बाकी सेल्स जैसे नहीं होते। यहां की खाल बेहद पतली होती है और इसमें सिकुड़न जल्दी आ जाती है। इसको सही तरीके से समझाते हुए डर्मेटोलॉजिस्ट डॉक्टर बताते हैं कि गर्दन की डर्माइसिस पतली होने के कारण यहां कॉलेजन अधिक मात्रा में मौजूद नहीं रहता और यहां झुर्रियां जल्दी आने लगती हैं। यहां मौजूद मांसपेशियां किसी हड्डी से जुड़ी नहीं होती हैं, इस कारण यहां का मांस जल्दी लटकना भी शुरू हो जाता है। ये सब देर से हो, इसके लिए जरूरी है कि गर्दन की देखभाल कम उम्र से ही शुरू कर दी जाए।

### व्यायाम से बढ़ेगी चमक



- बढ़ती उम्र का गर्दन पर जल्द और तेज असर नजर आने लगता है। चेहरे से पहले यहां की खाल और मांस ढीले पड़ने शुरू हो जाते हैं। इसके कसाव के लिए कुछ खास तरह के व्यायाम आपकी मदद कर सकते हैं। इसके लिए आपको अपने व्यायाम में गर्दन की स्ट्रेचिंग को शामिल करना होगा, जिन्हें आपको दिन में एक या दो बार करना होगा। इसके अलावा कुछ खास योगासन भी गर्दन की त्वचा में कसाव लाने में आपके लिए मददगार साबित होंगे। इनमें गर्दन को आगे-पीछे और दाएं से बाएं मोड़ना भी शामिल है।
- गलत तरीके से किया गया व्यायाम आपकी गर्दन में झटका ला सकता है, इसलिए इन्हें अच्छी तरह से समझकर ही करना चाहिए।

### ब्यूटी रुटीन में इन्हें करें शामिल

